VETBEA

PEOPLE FOR EQUALITY

Vocational Education and Training Buddhists Employees Association

धम्म चक्क

विशेषांक

२०२३

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्धांना दिलेल्या २२ प्रतिज्ञा

१. मी ब्रह्मा, विष्णू, महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

२. मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

३. मी गौरी-गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देव-देवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

४. देवाने अवतार घेतले, यावर माझा विश्वास नाही.

५. गौतम बुद्ध हा विष्णूचा अवतार होय, हा खोटा आणि खोडसाळ प्रचार होय असे मी मानतो.

६. मी श्राद्धपक्ष करणार नाही ; पिंडदान करणार नाही.

७. मी बौद्धधम्माच्या विरुद्ध, विसंगत असे कोणतेही आचरण करणार नाही.

८. मी कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणाचे हातून करवून घेणार नाही.

९. सर्व मनुष्यमात्र समान आहेत असे मी मानतो.

१०. मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.

११. मी तथागत बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.

१२. तथागताने सांगितलेल्या दहा पारमिता मी पाळीन.

१३. मी सर्व प्राणिमात्रावर दया करीन, त्यांचे लालन पालन करीन.

१४. मी चोरी करणार नाही.

१५. मी व्यभिचार करणार नाही.

१६. मी खोटे बोलणार नाही.

१७. मी दारु पिणार नाही.

१८. ज्ञान (प्रज्ञा), शील, करुणा या बौद्धधम्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून मी माझे जीवन व्यतीत करीन.

१९. माझ्या जुन्या, मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या व मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा मी त्याग करतो व बौद्धधम्माचा स्वीकार करतो.

२०. तोच सद्धम्म आहे अशी माझी खात्री पटलेली आहे.

२१. आज माझा नवा जन्म होत आहे असे मी मानतो.

२२. इत:पर मी बुद्धाच्या शिकवणुकीप्रमाणे वागेन अशी प्रतिज्ञा करतो.

संचालयनातर्फे उद्यम शिक्षा प्रोग्राम या वतीने उल्लेखनीय कार्याबद्दल अनुक्रमे सतिष आठवले व साहेबराव गुडधे यांचे गौरव

व्होकेशनल एज्युकेशन एन्ड ट्रेनिंग बुद्धिष्ट एम्प्लाईज असोसिएशनचे उद्दिष्टे–

१. भारतीय संविधानाबाबत जनजागृती करीता प्रचार व प्रसार करणे.

२. सर्व सभासद व नागरीकांमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय ही भावना रूजविण्याकरीता प्रयत्नशिल राहणे.

३. महाराष्ट्र राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त बुद्धीष्ट कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या अडचणी सोडविणे, त्यांच्या न्याय हक्कासाठी शासनाकडे पाठपुरावा करणे. त्यांच्यात ऐक्यभावना व नैतिकता रुजविणे.

४. गरीब व होतकरु प्रशिक्षणार्थ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या उन्नतीकरीता सहकार्य करणे.

५. खात्यास शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतीक व वैचारीक उपक्रम राबविणे.

६. आर्थिक दृष्टीने संघटना मजबुत करणे व बुद्धीष्ट कर्मचाऱ्यांच्या उन्नतीसाठी आर्थीक विकासाचे उपक्रम राबविणे.

७. शैक्षणिक व व्यवसायीक सहली आयोजित करणे.

८. सभासदाचे कौटुंबिक, सामाजिक व वैचारिक मळावे आयोजित करणे.

९. विशेष कार्याबद्दल अधिकारी, कर्मचारी व त्यांची पाल्ये यांचा सत्कार करणे.

१०. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष होणाऱ्या अन्यायाच्या विरुद्ध दाद मागणे व सनदशिर मार्गाने संघर्ष करणे.

११. महिलांच्या उन्नतीसाठी कार्य करणे.

१२. विभागीय स्तरावर सामाजिक भवन निर्माण करणे.

१३. असोसिएशनच्या सभासदाची कार्यक्षमता वाढविण्याकरिता कार्यशाळा आयोजित करणे.

१४. समविचारी संघटना/संस्था यांचेशी समन्वय करणे.

‘ शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही. ’
– बाबासाहेब डॉ.आंबेडकर

अष्टमंगलम्
किराणा मार्ट
आमच्याकडे बचत गट, हॉटेल, लग्नसमारंभ, घरगुती किराण्याचे ऑर्डर ठोक भावात स्विकारल्या जातील.
मास्टर कॉलनी, देवळी रोड, सावंगी मेघे, वर्धा.
फोन : 07152-299358
मो. : 9404822425, 9975051168

समस्त धम्म बांधव व भगिनींना धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या हार्दीक मंगल सदिच्छा !

अभिजीत आल्टे
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी , छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद)

प्रस्तावना

६७ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनी वाचकांचा हातात धम्म चक्क विशेषांक २०२३ देतांना आम्हाला आनंद होत आहे. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण बुद्धीष्ट एम्प्लाईज असोसिएशन (VETBEA) ही महाराष्ट्रातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया अंतर्गत कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची सामाजिक बांधिलकी म्हणून फुले शाहु आंबेडकर यांच्या विचारावर काम करणारी असोसिएशन आहे. या असोसिएशन अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी यांची कार्यक्षमता वाढविणे, सामाजिक एकोपा निर्माण करुन आपसात बंधूभाव रुजविणे, प्रत्येक अधिकारी कर्मचारी यांच्या ज्ञानामध्ये भर पाडणे, प्रशिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी सतत कार्यरत राहणे, इत्यादी उद्देश्य डोळ्यापुढे ठेवून कार्य करित आहे.

वेटबी ही अनेक समाजपयोगी उपक्रम राबवीत आलेली आहे. त्यामध्ये अत्यल्प दरामध्ये दिनदर्शीका, धम्मचक्क अनुवर्तन दिनानिमीत्य भारतीय संविधानाची उदेशिका बौद्ध अनुयायांना दिक्षाभूमिवर वाटप करणे, दत्ता भगत लिखीत, वाटा-पळवाटा नाट्यप्रयोग आयोजन, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचलनालय अंतर्गत पदभरती करिता महाराष्ट्रातिल बेरोजगार युवकासाठी निशुल्क मार्गदर्शन व शिकवणी वर्ग घेण्यात आले, विशेष करून अधिकारी व लिपीक वर्गीय कर्मचारी यांना प्रशासकीय काम करताना येणाऱ्या अडचणीचा विचार करुन तज्ञ मान्यवराचे व्हि.सी. द्वारे, मार्गदर्शन करणे, शासकीय योजनांची माहिती पत्रकाद्वारे जनसामान्य पर्यंत पोचविणे, आरक्षण व अनुसुचीत जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची माहिती प्रसारित करणे, इतर विविध समाजाउपयोगी कार्य करणाऱ्या संघटना सोबत समन्वय साधून सहकार्य करणे. भारतीय संविधान हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्वतंत्र भारताला मिळालेली देण आहे. भारतीय जनमानसच्या सामाजीक, राजकीय, आर्थिक व धार्मिक अशा विभिन्न पैलूंचा त्यामध्ये सखोल विचार केल्या गेलेला आहे. त्यामूळे भारतींय संविधानाचा प्रसार व प्रचार करणे, इत्यादी अनेक योजनांचा समावेश आहे.

त्याचाच एक भाग म्हणून यावर्षी धम्म चक्क विशेषांक २०२३ तयार करण्याचे ठरले. यामध्ये अत्यल्प वेळेत अनेक विचारवंनी आपले विचार मांडून आम्हाला सहकार्य केले. हे संपूर्ण विशेषांक डिझाइन करण्याचे मोठे कार्य आयु. सुशिल बुजाडे साहेब व आयु. अविनाश चहांदे सरांनी आपल्या खांद्यावर घेवून कमी कालावधीत अतिशय सुन्दर डिझाइन करण्याचे काम केले. विशेषांक मध्ये जाहीराती देवून बरेच मान्यवरानी आम्हांला आर्थिक मदत करून सहकार्य केले, तसेच महाराष्ट्रातील VETBEA सदस्याची देणगी रुपात भरमरुन आर्थिक मदत केले आहे.

या विशेषाकांत प्रकाशीत करित असलेले विचार लेखकाचे विचार असून आम्हाला आशा आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या दिक्षाभूमीवर येणारे बाबासाहेबांचे अनुयायी या विशेषाकांचे सहर्ष स्वागत करतील व त्यातील विचाराच्या बळावर जनसामान्याचा हक्काविषयी व अधिकारां करिता समाज जागृती करतील. हिच अपेक्षा.

समस्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुयायांना धम्म चक्क अनुवर्तनदिनाच्या मंगलमय सदिच्छा.

दि. २३/१०/२०२३
नागपूर

अध्यक्ष,
प्रेमानंद भैसारे
VETBEA
महाराष्ट्र राज्य

Dr. Shailesh Anil Ghodeswar

Bachelor of Dental Surgery
(BDS - Mumbai)

Dental Clinic

BHIM NAGAR, SAWANGI MEGHE,
NEAR BAHUJAN HITAY HOSTEL,
WARDHA.

प्रत्येक गोष्ट अनित्य आहे.
– भगवान गौतम बुद्ध

कौशल्य विकासाच्या संकल्पनेचे अग्रणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर...

विश्वगौरव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक थोर समाजसुधारक होते. त्यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान फार मोलाचे होते. बाबासाहेब हे भारतीय संविधानाचे शिल्पकार, आर्थिक धोरणाचे प्रणेते, प्रखर देशभक्त, झुंजार पत्रकार, संपादक लेखक, अहिंसेचे पुजारी, प्रभावी वक्ते, सच्चे लोकशाहीवादी, महिलांच्या हक्कासाठी संघर्षशील, प्रखर विज्ञाननिष्ठ, अर्थतज्ञ, कामगारांच्या चळवळीचे अध्वर्यू, ज्ञानपुरुष व समतावादी, उर्जा व जल संसाधनाचे नियोजक, अंधश्रद्धेचे विरोधक, आंतरराष्ट्रीय संबंधांचे भाष्यकार, एक चांगले संसदपटू होते. अशी कितीतरी पदे भूषवलेले हे व्यक्तिमत्व त्यांच्या बहुआयामी कार्याची दखल घेणारेच होते.

स्वातंत्र्यपूर्व काळात या देशामधील ग्रामीण भागात आर्थिक विकासाचे नियोजन करणे आवश्यक होते. हा आर्थिक विकास कसा होईल ? या आर्थिक विकासाची नीती कशी तयार करावी लागेल ? असे अनेक प्रश्न त्यावेळी बाबासाहेबांना पडत होते. ग्रामीण भागातील जी वाढणारी लोकसंख्या आहे त्यामधील अर्ध्या अधिक लोकांना उद्योगासाठी शहरात पाठवावे लागेल. त्यासाठी शहरात उद्योग धंदे सुरु करावे लागतील. तेव्हा उद्योग धोरण निश्चित केले पाहिचे हा त्यांचा प्रयत्न होता. ब्रिटिशांनी यावेळी शहरातील उद्योग धंदे सुरु करुन अनेक लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. यापूर्वी ग्रामीण भागातील वाहितीची जमीन कमी व त्यावर उदरनिर्वाह करणारे जास्त त्यामुळे ग्रामीण भागातील गरिबी दूर होत नव्हती. सन १९४२ मध्ये जगात दुसरे महायुद्ध अंतिम टप्पयात येऊनसंपत आले होते. या युद्धात भाग घेण्यासाठी भारताकडून इंग्लंडना गेलेले सैन्य मायदेशी परतण्याच्या तयारीत होते. या महायुद्धात जखमी झालेल्या व मायदेशी परतलेल्या भारतीय सैनिकांचे पुनर्वसन करण्याच्या उद्देशाने नियोजन करण्याची जबाबदारी भारतातील ब्रिटिश प्रधान मंत्र्यानी स्थापन केलेल्या मंत्रिमंडळातील मजूर मंत्री असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेकडे दिली. बाबासाहेब हे देश स्वतंत्र होण्यापूर्वी १९४२ ते १९४६ पर्यंत ब्रिटिश मंत्रिमंडळात मजूर मंत्री म्हणून कार्यरत होते. त्याकाळी जे अनुभवी व अधकुशल कामगार निरनिराळ्या उद्योगातून तयार होत होते त्यांना नोकरीसाठी भटकावे लागू नये म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जुलै १९४५ मध्ये कौशल्य विकास योजना सुरु केली. ही योजना १९४६ पर्यंत सैनिकांचे पुनवर्सन करण्याच्या संबंधाने कार्यरत होती. नंतर या सेवेचा स्वातंत्र्योत्तर काळात १९४८ मध्ये विस्तार करून बेरोजगार उमेदवारांसाठी एम्प्लॉयमेंट एक्सचेंज हा विभाग संपूर्ण देशात सुरु करण्यात आला. हा विभाग २००८ पर्यंत रोजगार व स्वयंरोजगार या नावाने ओळखला जायचा. भारत सरकारने २००९ मध्ये राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाची स्थापना केली व आज हा विभाग स्किल इंडिया या नावाने परिचित आहे. ब्रिटिश मंत्रिमंडळातील अतुलनीय कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ब्रिटिश मंत्रिमंडळात मजूर मंत्री म्हणून काम करण्यासोबतच केंद्रीय लोक निर्माण, ऊर्जा, जलसंवर्धन, खनिज व खाण उद्योग या एकूण पाच खात्याचा कार्यभार सांभाळत होते. त्यांचा प्रामाणिक हेतू हा होता की भविष्यात विकसनशील भारताला एक विकसित राष्ट्र करायचे असेल तर या देशामधील सामाजिक स्तर सुधारला पाहिजे. या देशातील प्रत्येक नागरिक हा स्वत:चा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी कुठेतरी काम करत असतो. काही लोक स्वयंरोजगार करतात तर काही लोक इतरांच्या कारखान्यात काम करुन आपला उदरनिर्वाह चालवितात. आज कारखात्यात काम करीत असलेल्या कामगाराला दर महा वेतन, महागाई भत्ता, विविध रजा, सणासुदीच्या रजा, आजारीपणाच्या रजा, भविष्य निर्वाह निधी, आरोग्य विमा, महिलांना प्रसुती काळातील रजा व वेतन कामगारांसाठी स्वस्त घरे अशा बऱ्याच सवलती मिळतात. परंतु या सवलती व सुविधा कशा मिळाल्या ? यासाठी कोणाचे योगदान होते हे सुद्धा विचारात घेणे आवश्यक आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या सामाजिक जीवनात कामगारांचे प्रश्न व त्यांच्या भिन्न समस्या अगदी जवळून बघितल्या होत्या. परंतु कामगारांचे विविध क्लिष्ट प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी ते आयुष्यभर लढत राहिले. या लढ्यात त्यांना अखेल यश आले व त्यांनी कामगारांना न्याय मिळवून दिला.कामगारांच्या मागण्या व त्यांचे हक्क अबाधित राहावे त्यासाठी एक कायदेशीर चौकट आवश्यक होती. त्यांनी कामगार, सरकार व कारखानदार अशी त्रिपक्षीय कामगार परिषद स्थापन केली व त्याला ब्रिटिश सरकारची मान्यता मिळवून दिली. या निर्णयामुळे कामगारांना नियमित सोयी सुविधा उपलब्ध होऊ लागल्या. कामगारांच्या कामाचे कसब वाढविण्याकरिता सरकारने त्यांना तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून द्यावे. जेणेकरून या शिक्षणातून कुशल कामगार तयार होतील व त्यांचे कौशल्य कामी पडून उत्पादन क्षमता वाढीस मदत होईल. अशी भूमिका त्यांनी ब्रिटिश सरकारपुढे मांडली. आपल्या मंत्रिमंडळाच्या कार्यकाळात त्यांनी एक नोव्हेंबर १९४४ रोजी कामगार कायद्यात दुरुस्त्या सुचवल्या त्यामुळे कामगारांना प्रामुख्याने महागाई भत्यात वाढ करणे. कामाचा योग्य मोबदला देणे. न्यायालयाच्या परवानगीशिवाय नोकरीवरुन काढू नये. आजारपण, अपघात, प्रसुती रजा, आरोग्यविषयक विमा.भविष्य निर्वाह निधी अशा अनेक बाबी कायद्याच्या चौकटीत आणल्या. त्याचा परिणाम असा झाला की आज स्वातंत्र्योत्तर काळातील कामगारांचे जीवन सुखकर व आनंदमय झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील

राजवैभव थोर असेल ; पण मी रयतेशी वचनबद्ध आहे.
ती वचनबद्धता त्या वैभवाहूनही थोर आहे.
– राजर्षी शाहू महाराज

कामगार, शेतकरी, विद्यार्थी, महिला अशा सर्वांनाच कायद्याच्या माध्यमातून संरक्षण दिले आहे. बाबासाहेबांनी देशाच्या संविधानाशिवाय अनेक महत्वाच्या क्षेत्रात अतुलनीय कार्य केले आहे उदा.ऊर्जा, जलव्यवस्थापन, धरणप्रकल्प, खनिजकर्म इत्यादि.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारत देश स्वतंत्र होण्यापूर्वी ब्रिटिश सरकारमध्ये मंत्री म्हणून कार्यरत होते. त्यांनी एका आधुनिक भारताचे स्वप्न बघितले होते. देशातील विपुल नैसर्गिक संसाधनांचा उपयोग मानवी कल्याणासाठी करायचा असेल तर त्यावर राष्ट्रीय सरकारचे नियंत्रण असणे गरजेचे आहे असे त्यांना वाटायचे. देशांमधील उद्योगधंदे व घरगुती वापरासाठी लागणारी वीज स्वस्त व अमर्याद पुरवठा करण्यासाठी त्याची कार्य पद्धती निश्‍चित करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर वीज प्राधिकरण स्थापन केले. या अंतर्गत वीज, कोळसा, पेट्रोल, यासारख्या मुख्य नैसर्गिक स्त्रोत्रांचा सर्व करून निर्मिती क्षमता वाढविण्यावर भर दिला.

पाण्याचा स्त्रोत आणि यंत्रसामुग्री यांचा ताळमेळ जुळविण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर वीजनक मंडळ स्थापन केले या अंतर्गत देशातील लोकांना विद्युत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी वीज केंद्राची उभारणी. यंत्रसामुग्रीची माहिती. देखभाल व दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने त्यांनी आपल्या खाते अंतर्गत कामकाजाचे नियोजन केले. हे पॉवर स्टेशन सुस्थितीमध्ये चालण्यासाठी या प्रकल्पावर काम करणाऱ्या कुशल कर्मचाऱ्यांना अद्यावत व आधुनिक प्रशिक्षण घेण्यासाठी परदेशात पाठवले. या माध्यामातून देशात औद्योगीकरण वाढून प्रत्येकाच्या हाताला रोजगार मिळेल. यामुळे देशातील गरिबी कमी होण्यास मदत होईल. ही त्यांची धारणा होती.

आपल्या देशात दरवर्षी पूर्वेकडील राज्यात महाकाय नद्यांना पूर येऊन मनुष्यहानी व वित्तहानी होत असते. या जलसंपतीचा अधिकाधिक उपयोग करुन घ्यावा म्हणून त्यांनी एक धोरण निश्चित केले होते. देशातील जलमार्गाचा वापर दळणवळण करण्यासाठी अशाप्रकारे केला जाईल याचे नियोजन त्यांनी आधीच करुन ठेवले होते. त्यासाठी दामोदर नदीवरील त्यांनी सर्वेक्षण सुरु केले. हा बहुउद्देशीय प्रकल्प असल्याने शेती साठी पाण्याचे सिंचन, वीज निर्मिती आणि जलवाहतूक हे उद्धेश समोर ठेवून त्यांनी या कामाला गती दिली. बंगाल, बिहार, ओरिसा राज्याच्या सहकार्याने त्यांना दामोधर, हिराकुंड, सोन नदी धरणाचा विकास करता आला. आपला देश हा अर्थ, वीज, उद्योग शेती , पाणी या क्षेत्रात परिपूर्ण व्हावा म्हणून त्यांनी जनकल्यानाची अनेक धोरणे तयार करून विकासाचा पाया रचला.

आज भारत जागतिक अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते भविष्यात या देशातील लोकांच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी केवळ व्यवसाय आणि आर्थिक वातावरण बदलण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध कौशल्यांच्या प्रगतीमुळेच शक्य आहे. परंतु हे काम गुणवत्ता आणि गुणात्मकता राखण्यासाठी आव्हाणात्मक राहील याची दखल घेणे प्रत्येक विद्यार्थ्यांना गरजेचे आहे. शेतीला उद्योगाचा दर्जा....स्वातंत्र्यपूर्व काळात भारतामधील शेतीप्रधान असलेले ग्रामीण जीवन आणि देशातील कमकुवत अर्थव्यवस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा चिंतनाचा विषय होता. कारण सावकारी पद्धतीमुळे शेतकरी हा दरिद्री झाला होता. शेतकऱ्यांच्या सर्व आर्थिक नाड्या त्या सावकारांच्या हातात असल्यामुळे तो सांपत्तीक दुरवस्थेचा बळी ठरला होता. सधन शेतकरी आणि शेतमजूर यामधील सरळ संबंध हा शोषक आणि शोषित अशा स्वरुपाचा असल्यामुळे सामान्य शेतकऱ्याचे भवितव्य अंधकारमय झाले होते.

सावकारी पद्धत बंद झाली पाहिजे. शेतकऱ्यांना माणुसकीचे आणि आर्थिकतेचे हक्क मिळवून दिले पाहिजे. शेतकऱ्याचे भवितव्य सुधारले पाहिजे त्याला या दास्यातून मुक्ती मिळाली पाहिजे असाा निर्धार बाबासाहेबांनी त्यावेळी व्यक्त केला होता.

शेती, शेतकरी आणि शेतसारा यांचा एकमेकांशी जवळचा संबंध आहे. भारताच्या विपणणावस्थेची कारणमिमांसा देताना बाबासाहेबांनी शेतकऱ्यांकडून शेतसारा वसुल करण्याची पद्धत चुकीची असल्याचे मत प्रदर्शित केले. ते म्हणाले होते की सरकार तर्फे वसुल करण्यात येणारा शेतसारा हा शेतीच्या उत्पन्नाच्या तुलनेत अधिक जास्त असतो. त्यामुळे शेतकऱ्यावर हलाखीची परिस्थिती ओढवली जाते. शेतकऱ्याला उत्पन्न जरी झाले नाही तरी त्यास दरवर्षी शेतसारा भरावाच लागतो. शेतजमिनीचे उत्पन्न लक्षात घेऊन शेतकऱ्यावर दर एकरी उत्पन्नावर शेतसारा आकारला जातो. यामध्ये सधन व गरीब शेतकरी सारख्याच प्रमाणात शेतसारा भरतो. याचे कारण सरकारी शेतसाऱ्याचा समान प्रमाणित आकार होय. हा आर्थिक विसंवाद टाळण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उत्पन्नाऐवजी एपत हा निकळ लावल्यास प्रश्न अधिक सुलभ होईल अशी मागणी केली होती. त्यासाठी त्यांनी इनकम टॅक्सची कल्पना अंमलात आणण्याची सूचना सरकारला केली. शेतसारा हा इन्कम टॅक्सच्या कायद्याखाली आणला पाहिजे त्यामुळे श्रीमंत शेतकरी त्याच्या एपतीप्रमाणे व गरीब शेतकरी ठराविक ऐपतीच्या खाली असेल तर त्याला कराच्या जाचातून मुक्त करता येईल. भारतातील शेतकऱ्यांच्या शेती उत्पन्नावर कर बसवण्याची सूचना करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिले अर्थशास्त्रज्ञ् होते असेच म्हणावे लागेल.

भारतामध्ये ग्रामीण भागातील सुधारणा अर्थव्यवस्थेशी संबंधित असल्यामुळे त्या क्षेत्रामध्ये अद्यावत सुधारणा करण्यावर बाबासाहेबांनी अधिक भर दिला होता. महात्मा ज्योतिबा फुले, लोकहितवादी यांनी सुद्धा या आधुनिकी करण्याचा त्यांचे काळात पुरस्कार केला होता. पण

ऐक्य, परस्पर प्रेम, विश्वास व चिकाटीचे सतत प्रयत्न ही आमची शास्त्रे असली पाहिजेत.

– राजर्षी शाहू महाराज

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शेती सुधारणेचा संबंध देशाच्या अर्थव्यवस्थेशी जोडला होता. शेतीचा पाश्चात्य देशाप्रमाणे सामूहिक शेतीचा प्रयोग, शेतीचे राष्ट्रीयीकरण याला त्यांनी अग्रक्रम दिला होता. शेती ला उद्योगाचा दर्जा देऊन तो राज्याचा प्रमुख उद्योग मानला जावा, असे त्यांनी सुचविले होते. सन १९३९ च्या मुंबई कौन्सीलमध्ये त्यांनी देशाच्या औद्योगिक करणावर अधिक भर देऊन गरिबी कशी दूर करता येईल यावर आपले मत मांडले. मुंबई प्रांतातील अर्ध्या अधिक शेतकऱ्यांनी शेतीच्या धंद्यात गुंतून न पडता अन्य उद्योग धंदयाचे मार्ग निवडावे. ग्रामीण भागातील सर्व प्रश्नावर रामबाण उपाय म्हणजे तेथील लोकांनी शहरात यावे. कारखान्यातून काम करावे जेणेकरुन अंगी तांत्रिक कामाचे कौशल्य अवगत होऊन उद्योगधंदे वाढीस लागतील.

रवींद्र दांडगे
शिल्पनिदेशक यांत्रिकी इलेक्ट्रॉनिक्स,
अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती.

प्रोप्रा. सत्यपाल वाकपैंजन
M : 9503295882, 9834658455

सत्यपाल
स्क्रॅप मर्चंट
आमच्याकडे सर्व प्रकारचे
भंगार (स्क्रॅप)
लोहा, प्लास्टीक, वही,
रद्दी, खड्डा घेतल्या जाईल.
मेन रोड, वर्धमनेरी, ता.आर्वी, जि. वर्धा

चळवळीतील कडवट मानसिकता

समाजमाध्यमावर जातीधर्मावर आधारीत ग्रुपची सद्या रेलचेल आहे. या शिवाय वैयक्तिक स्तरावरही लोक कायम जातीधर्मावर आधारीत पोस्ट टाकत असतात. ज्यांना जाती संस्थाचा फायदा होतो ते आणि ज्यांना जातीचा तोटा होतो तेही आत्यंतिक कडवट पोस्ट टाकत असतात. जातीतील इतरांनी असे करावे, असे करू नये यावर लिहीत असतात. 'एक करोड लोकांचा अमक्या अममक्या जातीचा ग्रुप' अशीही कैक आमंत्रणे मधुनमधून समाजमाध्यमांवर दिसतात. 'जगात भारी एक जात हमारी' अशा पद्धतीच्या जातीला कुरुवाळणाऱ्या पोस्ट दिसतात. तात्पर्य असे की आमची जात म्हणजे फारच महान अशा पद्धतीची ही मांडणी आहे. जी की संकुचीतपणाची आहे. खरे तर जात वा धर्म हे अभिमानाचे विषय नाहीत. मला तरी माझ्या जातीचा वा धमा;चा मुळीच अभिमान वा गर्व नाही. कारण जात वा धर्म हा आपल्याला जन्माने चिकटून येतात. मी कुठे जन्म घ्यावा हे माझ्या हाती नव्हते. मात्र कोणती विचारसरणी स्वीकारावी हे आज माझ्या हाती आहे. त्यामुळेच मी जाती धर्मावर आधारीत फेसबुक वा व्हाटसअपवरील एकाही कडवट ग्रुपचा सदस्य नाही. महत्वाचे हे की, व्हाटसअपवर देखील निवडक प्रयोगशील ग्रुपमध्ये आहे. त्यातीलच पोस्ट पाहतो आणि कधी तरी चर्चेत सामील होतो. शेकडो ग्रुपमध्ये राहिल्यावर दिवसातला अर्धा अधिक वेळ फक्त मॅसेज वाचण्यात वा डिलीट करण्यातच जाईल. त्यामुळे निवडक प्रयोगशील वा वैचारिक ग्रुपवर राहिल्यास आपल्याला स्वत:साठी वेळ मिळू शकतो. त्यातून मनाला शांतता लाभते. या शांततेचा उपयोग मला लिहायला-वाचायला होतो.आपणही असे प्रयोग करून पहायला हरकत नाही.

आपण स्वत: जर या कडवटपणापासून दूर गेलो तरी लोक मात्र आपल्याला कायम जाती-धर्माचा चष्म्यातूनच पाहत असतात. त्यांना तुमच्या या संदर्भातील भूमिका ठाऊक नसतात. मला जातीच्या लोकांपेक्षा विचारांचे लोक जास्त महत्वाचे वाटतात. कारण जाती ह्या बंदिस्त आहेत. त्याला चिकटलेली माणसे तुम्हाला अधिकाधिक कडवटपणाकडे नेत असतात. आणि कडवट जात्याभिमान हीच तर या देशाची समस्या आहे. मात्र तो कडवटपणा लोकांमध्ये रूजावा यासाठी त्या त्या जातीचे लोक जातीच्या शौर्याच्या कहाण्या आवर्जुन शेअर करीत असतात. खरे तर प्रत्येक जाती-धर्माला शौर्याचा आणि क्रौर्याचा इतिहास आहे. जगाच्या पाठीवर माणसामध्ये जाती फक्त भारतात आहेत. 'जातीसाठी माती खावी' हा कुसंस्कार देखील आपल्याच देशात आहे. त्यामुळेच चांल्याचं कौतुक करताना वा वाईटाचा निषेध करताना आपल्या देशात बहुसंख्य लोक जातीच्या विचार करतात. जात पाहून व्यक्त होतात. त्यानुसार लोकांची प्रतिक्रिया ठरलेली असते. अशात

प्रवाहाच्या विरुद्ध तेच पोहू शकतात ज्यांचे निर्धार ठाम असतात.
ज्यांना कुठलेतरी ध्येय गाठायचे असतात.
– महात्मा ज्योतिबा फुले

तर जातीचे लाभार्थी असलेलेही काहीजण जातीच्या बाहेर जाऊन माणूसपणाचा विचार करु लागले आहेत आणि जाती संस्थेच्या चरकात पिळल्या गेलेले मात्र वृथा आपल्या जातीचा अभिमान बाळगताना दिसताहेत.

हल्ली महापुरुषांच्या जयंत्या-पुण्यतिथ्या साजऱ्या करताना आपण आपल्या जातीबाहेरच्या माणसांना बोलावू नये इतपत मांडणी करणारे अनेक महाभाग दिसव आहेत. ते अमक्या अमक्या महापुरुषाला आम्हीच जीवंत ठेवले वा मोठे केले असेही म्हणतात. महापुरुषांच्या अशा पद्धतीच्या वाटण्या लोकांनीच करून ठेवलेल्या आहेत. त्यातही अमक्या अमक्या महापुरुषाच्या आधीही कोणी नाही आणि नंतरही कोणी नाही, अशा पद्धतीची ही मांडणी दिसते. ज्या महापुरुषांनी शब्दप्रामाण्य नाकारले त्यांनाच त्यात बांधून ठेवायला अनुयायी तयार असतात. हा उताविळपणा घातक आहे. खरे तर समाजप्रबोधनाची प्रक्रिया ही अव्याहत चालणारी आहे. यात इसवी सनापूर्वी पासून ते आजपर्यंत अनेक लोकांची नावे येतात. मात्र त्या महापुरुषांनी त्या काळात अगदी 'अमुकच का नाही केले?' असे प्रश्न विचारणारी आणि ज्या महापुरुषांच्या जीवन कार्याचा एका ओळीत निकाल लावणारे लोक जागोजागी दिसतात. 'आम्ही तेवढे ग्रेट आणि बाकीचे बेईमान वा पुळचट' अशी मांडणी धोकादायक आहे. माणसाला माणसापासूनच तोडणारी आहे. इतरांना जातीच्या आधारावर कमअस्सल वा नकली ठरवणारी आहे. हे माणुसपणाच्या जवळ जाणारे नाही. दूर नेणारे आहे. शत्रू मजबूत असला तर मित्रांची फौज उभारावी लागते. ही शिवनिती आपल्याला ठाऊक हवी. कारण एकटा दुकटा माणूस बलाढ्य शक्तीविरुद्धच्या लढाईत टिकू शकत नाही. समाज परिवर्तनाच्या लढाईचेही असेच आहे. यात सामील होणारा माणूस आधी घरच्यांशी लढतो आणि मग समाजाशी. मात्र त्यातही तो अमूक जातीत जन्माला आला असल्याने त्यातच काम करावे. इतर जातींना शहाणपण शिकवू नये असे लिहिणाऱ्यांचे कळप माध्यमांवर दिसू लागले आहेत. त्यातून पुरोगामी वा प्रतिगामी अशी झटपट प्रमाणपत्रे वेगाने वाटू लागली आहेत. जन्माचे मोठेपण सांगत आम्ही म्हणजे पुरोगामीच हे प्रचंड धाडसी(?) काम ते करत आहेत. त्यातून माणसे एकमेकांपासून दूर जाताहेत.

महापुरुष आजच्या काळात असते तर त्यांनी कोणती भूमिका घेतली असती ? यावरही लोक विचार करायला तयार नाहीत. अजूनही लाठी-काठीनेच लढले पाहिजे असा विचार व्यक्त होतो तेव्हा आश्चर्य वाटते. कोणत्याही चळवळीने काळाची पावले ओळखली पाहिजे. सरळसरळ लढाई ऐवजी डावपेचाचा भाग म्हणूनी लढायचे असते. सर्वात महत्वाचे हे की, आपले मित्र ओळखले पाहिचे. मित्र जोडले पाहिजे. त्यासाठी अडसर ठरणारा कडवट जात्याभिमान टाळला पाहिचे. आपल्या देशात इतरांचे अनुकरण (कॉपी) करण्याची लोकांना सवय आहे. एखादा व्यक्ती वा समुदाय त्याच्या जातीची शेखी मिरवितो म्हणून आपणही त्याच मार्गाने जाऊ नये, ज्याला हे कळते त्यांनी माणुसपणाचा उन्नत होणारा मार्ग स्वीकारला पाहिजे. त्यासाठी स्व-जातीतील वैगुण्य शोधून मगच इतरांवर दुगाण्या हाणल्या पाहिजे.

रवींद्र साळवे, बुलडाणा
मो. 9822262003

समस्त धम्म बांधव व भगिनींना
धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या
हार्दीक मंगल सदिच्छा !

प्रफुल वानखेडे

SAVERA
DEVELOPERS

ENGINEERS
BUILDERS
DEVELOPERS

Office : Flat No.1 EA-5,
Shreenath Sai Nagar,
Near Omkar Nagar Sq.,
NAGPUR-27

समाजातील खालच्या वर्गाची तोपर्यंत बुद्धिमत्ता, नैतिकता, प्रगती आणि समृद्धिचा विकास होणार नाही.जोपर्यंत त्यांना शिक्षण दिले जात नाही.
– महात्मा ज्योतिबा फुले

बाबासाहेबांचा संघर्ष आम्ही विसरत आहो का ?

जगामध्ये अनेक क्रांत्या झालेल्या आहे. परंतु प्रत्येक क्रांतीमध्ये मनुष्याचे रक्त सांडलेले आहे. रक्त सांडल्याशिवाय क्रांतीचा आस्वाद लोकांना घेता आलेला नाही. परंतु भारतामध्ये विसाव्या शतकाच्या मध्यात रक्ताचा एक थेंबही न सांडवता जगातील फार मोठी क्रांती झाली आहे. या क्रांतीने जगातील सर्व अभ्यासक, समाज शास्त्रज्ञ, इतिहासतज्ज्ञ यांना आश्चर्यचकित केले आहे. त्यामुळे या क्रांतीकडे संपूर्ण जग आजही अतिशय सन्मानाने आणि अभ्यासाचा विषय म्हणून पाहते. ही रक्तविरहीत क्रांती घडवून आणणारे जगप्रसिद्ध महापुरुष व या क्रांतीचे जनक आहे महान समाजसुधारक विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी ऐतिहासिक नागभूमी नागपूरच्या दीक्षाभूमीवर या महामानवाने लाखो लोकांच्या जनसमुदायाला सोबत घेऊन ही क्रांती घडवून आणलेली आहे व इतिहासात अभूतपूर्व घटना म्हणून नोंद करवून घेतली आहे. एका माणसाच्या शब्दावर लाखो लोक स्वाभिमानाने संघटीत होतात आणि एका धर्मातून दुसऱ्या धर्मात प्रवेश करतात ही गोष्ट इतकी सहज, साधी आणि सोपी नाही. धर्मांतर करणे हे कोणत्याही माणसासाठी कपडे बदलण्याइतकी साधी गोष्ट नसते. त्यासाठी मनाचा निर्धार, निश्चय आणि मानसिक तयारी लागत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या लाखोंच्या जनसमुदायाची आपल्या क्रांतीकारी विचारांनी अशा प्रकारची मानसिक तयारी केली होती की कोणाच्याही प्रलोभनाला बळी न पडता हा लाखोंचा जनसमुदाय त्यांच्या एका शब्दावर काहीही करण्यास तयार होतो ही गोष्ट अतिशय विचार करण्यागोजी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येवला येथे १०३५ रोजी हिंदू धर्म त्यागण्याची प्रतिज्ञा केली होती. १९३५ ते १९५६ या २१ वर्षाच्या कालखंडात त्यांना अनेक प्रलोभने आली. वेगवेगळ्या धर्माच्या धर्मपंडितांनी त्यांना आपल्या धर्मात येण्यासाठी आग्रह केला. त्यांना मान सन्मानाचे पद देण्याची लालूच दाखवली. पैशांच्या राशी बाबासाहेबांसमोर ठेवण्यात आल्या. आणखी बऱ्याच सुखसुविधा, ऐश्वर्य पैशाचे प्रस्ताव त्यांच्यासमोर मांडण्यात आले. परंतु बाबासाहेबांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता स्वत:च्या बुद्धिमत्तेने निर्णय घेतला. सर्व धर्माचा प्रचंड अभ्यास केला. कोणता धर्म आपल्या समाज बांधवांसाठी योग्य राहील व कोणत्या धर्मात प्रवेश केल्यानंतर खऱ्या अर्थाने आपल्या समाज बांधवांचे सर्वांगीण परिवर्तन व विकास होईल यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील सर्व धर्माचे धर्मग्रंथ रात्रंदिवस अभ्यास करून वाचून समजून घेतले. आपल्या समाज बांधवांचा भविष्यात कोणत्या धर्मात विकास होऊ शकतो आणि कोणता धर्म आपल्याला मानवतेकडे घेऊन जातो याचा सखोल अभ्यास केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भगवान गौतम बुद्धांचा बुद्ध धम्म

हा अतिशय योग्य आणि समाजपयोगी धर्म वाटला आणि शेवटी त्यांनी स्वत:च्या बुद्धीने निर्णय घेऊन बुद्ध धम्माची दीक्षा घेतली व आपल्या लाखो अनुयायांना योग्य दिशेने येऊन गेले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या निर्णयाने जगामध्ये त्यांचा नावलौकिक वाढला. संपूर्ण जग त्यांच्याकडे वेगळ्या आशेने पाहू लागले. भारत बुद्धमय करण्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मनीषा होती. त्यासाठी त्यांनी आपले सर्व कौशल्य पणाला लावले होते. परंतु बाबासाहेबांच्या प्रकृतीने त्यांना साथ दिली नाही आणि बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यानंतर बाबासाहेब दोन महिन्यातच आपल्यातून निघून गेले. त्यामुळे बाबासाहेबांनी आपल्या संपूर्ण हयातभर स्वत:साठी काहीही न करता वंचित, शोषित, तळागातील लोकांकरीता आपले आयुष्य खर्ची घातले होते. त्यांच्यासाठी अपमान सहन केला होता. अनेकांसोबत विरोध पत्करला होता. स्वत:च्या कुटुंबाकडे दुर्लक्ष केले होते आणि असंख्य लोकांचे कुटुंब उभे करण्यासाठी आपल्या जीवाचे रान केले होते. त्यांच्या संघर्ष आणि समर्पणामुळे आज असंख्य बहुजन बांधव सुखाचे आणि समाधानाचे जीवन जगत आहे. त्यांच्या त्यागामुळे आज आम्हाला खऱ्या अर्थाने माणूसपण लाभलेले आहे.

परंतु बाबासाहेबांनी आमच्याकरीता केलेल्या या संघर्षाचा खरोखर आम्ही गांभीर्याने विचार करतो का ? बाबासाहेबांचा त्याग, समपर्ण, कष्ट, मेहनत आणि संघर्ष आम्ही विसरलेलो आहे असे आम्हाला वाटत नाही का ? ज्या उद्देशाने बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला बौद्ध धर्माची (धम्माची) दीक्षा देऊन जनावरासारख्या वागणुकीतून माणसांमध्ये आणले; त्या धम्मानुसार आमचे सध्याचे आचरण आहे का ? धम्माची दीक्षा घेताना बाबासाहेबांनी ज्या २२ प्रतिज्ञा आम्हाला दिल्या होत्या. त्या प्रतिज्ञा आम्ही आमच्या जीवनात आचरण्यात आणतो का ? त्यानुसार समाजात आमची वर्तणूक असते का ? या सर्व प्रश्नांवर सुद्धा आम्हाला अतिशय गांभीर्याने चिंतन आणि मंथन करण्याची गरज निर्माण झाली आहे. बाबासाहेब गेल्यानंतर त्यांनी आमच्यावर जी

जग बदल घालूनी घाव, आम्हा सांगून गेले भीमराव
– अण्णाभाऊ साठे

जबाबदारी सोपवलेली होती. त्यांनी आम्हाला ज्या हेतूने धम्माची दीक्षा दिली होती; तो धम्म वाढविण्यासाठी आम्ही काही प्रयत्न करतो का याचा सुद्धा आम्हाला विचार करणे गरजेचे आहे. ज्या बाबासाहेबांनी सर्वांना संघटित केले व विराट शक्ती निर्माण केली ती शक्ती आज विघटित का झालेली आहे. आम्ही एकमेकांपासून दूर का चाललेलो आहे. आमचे आपसातच का पटत नाही, आमचे असंख्य गट-तट का निर्माण झालेले आहे. राज्यकर्ती जमात होण्याचे बाबासाहेबांचे स्वप्न आम्ही पूर्ण केलेले आहे का ? की आम्हीच आपसामध्ये भांडत आहो? **'शिका,संघर्ष करा आणि संघटित व्हा '** यामधील शिक्षण जरी आम्ही घेतलेले असले तरी आम्ही खरोखर संघटित झालेलो आहे का हा प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहे. संघर्ष कोणासोबत करायचा हे बाबासाहेबांनी आम्हाला असंख्य वेळा सांगितलेले असतानाही आमच्या शत्रू सोबत संघर्ष करण्याच्या ऐवजी आम्ही आपसातच संघर्ष करून एकमेकांचे शत्रू बनत चाललेलो आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे इतरांना दोष देण्यापेक्षा बाबासाहेबांचा विचार कमजोर करण्यासाठी आम्ही स्वत:च दोषी नाही का याचाही विचार केला पाहिजे. बाबासाहेबांचा विचार पुढे नेण्यासाठी स्वत:ला कट्टर आंबेडकरवादी समजणाऱ्या लोकांपेक्षा दुसरे लोक मनापासून प्रयत्न करीत आहे. परंतु खरी जबाबदारी ही बौद्ध धर्माची दीक्षा घेतलेल्या लोकांची आहे. बाबासाहेबांनी आम्हाला जाहीरपणे ती जबाबदारी सोपवलेली आहे. त्यामुळे ती जबाबदारी प्रामाणिकपणे व संघटितपणे पार पाडणे हे आमचे कर्तव्य आहे. परंतु आम्ही आमच्या कर्तव्याला विसरलेलो असून बाबासाहेबांच्या विचारांसोबत प्रतारणा करीत अहोत असे म्हटले तरी वावगे होणार नाही.

ज्या लोकांना बाबासाहेबांचा विचार पटत नाही, जे लोक पूर्वीही बाबासाहेबांचे शत्रू होते आणि आजही बाबासाहेबांच्या विचाराला उध्वस्त करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत आहे त्यांचा मुकाबला करणे व त्यांचे षडयंत्र हाणून पाडणे ही आमची प्रमुख जबाबदारी आहे. परंतु असे न करता आमच्यातील अनेक जण शत्रूच्या गोटात सामील झालेले आहे. बाबासाहेबांची घटना बदलण्यासाठी आम्ही सत्तेवर आलेलो आहे असे म्हणणाऱ्या लोकांच्या मांडीला मांडी लावून, स्वत:ला बाबासाहेबांचे अनुयायी म्हणवून घेणारे लोक बसत आहे ही अत्यंत खेदाची बाब आहे. राजकारणाच्या शुल्लक स्वार्थासाठी आम्ही बाबासाहेबांचे विचार पूर्णत: पायदळी तुडवीत असून शत्रूंना शरण गेलेलो आहोत. डॉ. नरेंद्र जाधव सारखा स्वत:ला बाबासाहेबांच्या विचारांचा अनुयायी म्हणविणारा विद्वान माणून आर.एस.एस. च्या विचारांचे समर्थन करतो आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हेडगेवार यांचे विचार व मार्ग एकच होते अशी जाहीरपणे वल्गना करतो. यापेक्षा आणखी दुर्दैवाची बाब कोणती असू शकते ? रामदास आठवले सारखा माणूस आज आर.एस.एस. च्या कळपात जाऊन शेळीसारखा वागतो व त्यांच्या मनुवादी विचारांचे समर्थन करतो. त्यामुळे बाबासाहेबांचा विचार नेस्तनाबूद करण्यासाठी शत्रूपेक्षा आम्हीच जास्त जबाबदार आहोत हे कटू असले तरी सत्य आहे. आज देशाची परिस्थिती अतिशय भीषण आहे. देश गृहयुद्धाच्या वाटेवर चाललेला आहे. भारताचे संविधान नष्ट करणारी यंत्रणा मोठ्या प्रमाणात कार्यरत झालेली आहे. देश गृहयुद्धाच्या वाटेवर चाललेला आहे. भारताचे संविधान नष्ट करणारी यंत्रणा मोठ्या प्रमाणात कार्यरत झालेली आहे. संविधान नष्ट करुन त्यांना पुन्हा या देशात मनुस्मृती लागू करायची आहे. अशावेळी बाबासाहेबांच्या अनुयायांची जबाबदारी फार वाढलेली आहे. आम्ही जर चूप बसलो, शांत राहिलो आणि शत्रूच्या गोटात सामील झालो तर भविष्यात बाबासाहेबांचा विचार आम्हाला या देशात दिसणारही नाही. बाबासाहेब हे फक्त फोटो पुरते मर्यादित राहतील आणि त्यांच्या विचारांची जागा मनुस्मृतीचे समर्थक घेतल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे बाबासाहेबांचा विचार जर आम्हाला टिकवून ठेवायचा असेल आणि महात्मे जर आम्हाला समजले असेल तर आम्हाला विवेकाने, गांभीर्याने, ताकदीने आणि संघटितपणे बाबासाहेबांच्या विचारांना टिकून ठेवण्यासाठी शत्रू सोबत मुकाबला करावा लागेल. अन्यथा आम्हा सर्वांसाठी येणारा काळ अत्यंत कठीण असणार आहे व त्यासाठी आमच्या भावी पिढ्या आम्हाला दोषी ठरविल्याशिवाय राहणार नाही.

प्रेमकुमार बोके
(प्रसिद्ध व्याख्याते व लेखक)
अंजनगाव सुर्जी
मो. 9527912706

समस्त धम्म बांधव व भगिनींना धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या हार्दीक मंगल सदिच्छा !



आयु.आनंद सोनटक्के
आयुष्यमती सुवर्णा सोनटक्के
चि.अर्णव व कु.अलोकश्री सोनटक्के

माणसाला आपल्या दारिद्र्याची लाज वाटता कामा नये,
लाज वाटायला हवी आपल्या अंगी असलेल्या दुर्गुणांची
- बाबासाहेब डॉ.आंबेडकर

"सनदी अधिकाऱ्यांनो - अन्याय-अत्याचारा विरुद्ध भूमिका घ्या"

आरक्षित मतदार संघातून निवडून आलेल्या अनुसूचित जाती व जमातींच्या खासदार, आमदार यांना प्रश्न कमी विचारले जातात परंतु दूषणे अधिक दिल्या जातात, हे आरक्षणाचे असून काहीच करीत नाहीत. विधिमंडळात, संसदात बोलत नाहीत, प्रश्न मांडत नाही. समाजावर अन्याय अत्याचार होतात तरी चूप राहतात. आरक्षण देऊन काय उपयोग ? हे तर राजकीय पक्षाचे गुलाम वैगरे म्हटले जाते. आरक्षणाचे प्रतिनिधी म्हणून समाजाच्या काहीच उपयोगाचे नाहीत असे ही म्हटले जाते. परंतु या लोकप्रतिनिधिंचा व बाबासाहेबांच्या विचारांचे राजकीय पक्ष व नेते यांचा आधार ही समाजाला आहे. कार्यकर्ते अन्याय अत्याचार विरुद्ध बोलतात.विषय उचलतात, आंदोलन करतात, रस्त्यावर उतरतात. शासन–प्रशासनाला प्रश्न विचारतात. त्यामुळे वचक आहे. हे दुर्लक्षित करता येणार नाही. फक्त दोष व दूषणे देऊन काहीच साध्य होत नाही. असो.

दुसरी बाजू पाहिली तर शासन प्रशासनात आरक्षणाचा लाभ घेऊन आलेले व कार्यरत असलेले अनेक सनदी अधिकारी आहेत. इतरही आहेत. काही, मंत्रालयात सचिव, प्रधानसचिव, अति मुख्यसचिव म्हणून कार्यरत आहेत. काही विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, सीईओ, महानगरपालिका आयुक्त आहेत. पोलीस विभागात उच्च पदी आहेत. सर्वच खात्यात आहेत. काही राज्यस्तरीय विभागाचे प्रमुख आहेत. नायब तहसीलदार, तहसीलदार, एसडीओ, उपजिल्हाधिकारी, अति जिल्हाधिकारी आहेत. काही बीडीओ, उप मुकाअ, अति मुकाअ आहेत. मंत्रालयात अनेक कक्ष अधिकारी, अवर सचिव, उपसचिव, सह सचिव आहेत. यांच्या समाजहिताच्या भरीव योगदाणाचे मूल्यमापन करण्याची आवश्यकता आहे. एकूणच, समाजाचे प्रतिनिधी म्हणून शासन प्रशासन व्यवस्थेतील दुरावस्था दूर करण्यासाठी बदल, परिवर्तनासाठी चे ठळक काम कोणते ? रुटीन पेक्षा वेगळे काय करीत आहेत ? जे करीत आहेत ते कोण आणि करीत नाहीत, आपलेच कोषात आहेत ते कोण ? हे समाजाने माहीत करुन घेण्याची गरज आहे.

या सर्वांनाच संविधानाचा लाभ मिळाला आहे, घेतला आहे. पहिली पिढी अतिशय कष्ट घेऊन, संघर्ष करून प्रशासनात आली, निवृत्त ही झाली. शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, हॉस्टेल ची सुविधा अनेकांना मिळाली, संविधानिक आरक्षण मिळाले. अनेकांना महत्वाच्या मोठ्या मोठ्या पदावर काम करण्याची संधी मिळाली. दुसरी पिढी आज ही कार्यरत आहे. संविधानाचे फायदे घेऊन, सन्मानाचे जीवन जगत आहे. हे सगळं, संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांनी संविधानात केलेल्या तरतुदी मुळे, १४ ऑक्टोबर १९५६ च्या धम्म क्रांती मुळे घडलं आहे, घडत आहे. शासन प्रशासनातील कर्मचारी अधिकारी वर्ग तर आहेच शिवाय शिक्षक, प्राध्यापक, इंजिनिअर्स, डॉक्टर्स, विविध क्षेत्रात (खाजगी क्षेत्रासह) अनेक आहेत. मोठ्या संख्येने असताना सुद्धा, अन्यायाविरुद्धचा यांचा आवाज मात्र क्षीण आहे. अनेक जण तर बोलतच नाहीत. बोलावे लागेल, सामाजिक न्यायासाठी सत्ताधाऱ्यांकडे संघटित पण आग्रह करावा लागेल. व्यक्तिकेंद्रित न होता समाजहिताचा विचार करावा लागेल कारण हे सगळे संविधानाचे लाभार्थी आहेत.

आरक्षण हे सामाजिक प्रतिनिधित्व आहे. समानतेसाठी विशेष संधी आहे. त्यामुळे, आरक्षणाचा लाभ घेतलेल्या अधिकारी कर्मचारी व इतर सर्वांकडून सामाजिक दायित्वची फार मोठी अपेक्षा आहे. दोन तीन इव्हेंट करणे, थोडीफार मदत करणे, कार्यक्रमाना हजेरी लावणे, हितसंबंधितांना लाभ देणे, कधीकधी जयभीम म्हणणे एवढ पुरेसे नाही. खूप गोष्टी आहेत त्याकडे ही लक्ष द्यावे लागेल. अजूनही शोषित–वंचित–दुर्बल वर्गांना जातीचे दाखले मिळाले नाहीत म्हणून योजनांचा लाभ मिळत नाही.रेशन काड्स नाही, जमीन नाही, घर नाही, शिक्षण, आरोग्य, रोजगार, उपजीविका व सुरक्षितता हे प्रश्न फार मोठ्या प्रमाणात आहेत. वस्तीत सुविधा नाहीत. या समाज घटकांना अजूनही सन्मानाचे जीवन प्राप्त झाले नाही. हे मिळवून देण्यासाठी स्वत: पुढाकार घेऊन, पाठपुरावा करून सोयी सुविधा मिळवून देणारे, समाजहितासाठी, न्यायासाठी, झटणारे अधिकारी किती ? समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचारविरुद्ध, घडणाऱ्या चुकीच्या गोष्टी संदर्भात आवाज करणारे, बोलणारे, प्रश्न विचारणारे सनदी अधिकारी किती आहेत ? अनुसूचित जाती, आदिवासी, पारधी, भटके विमुक्त यांच्या वस्तीकडे प्रशासन फिरकून पाहत नाही अशा वस्त्या समाजाच्या अधिकाऱ्यांनी दत्तक घेतल्या, भेटी दिल्या तर चांगले घडेल.

आम्ही असा प्रयोग नागपूर विभागात करीत आहोत. जवळपास ४५० शोषित वंचित वस्त्याची यादी नागपूर च्या विभागीय आयुक्त यांचेकडे सोपविली आहे. आम्ही मांडलेल्या वरील समस्यांना दूर करण्यास प्रतिसाद मिळू लागला आहे. असा समज करून घेण्यात आला आहे की सेवेत कार्यरत असताना सरकार विरुद्ध बोलता येत नाही. सरकार विरुद्ध बोलायचे नाहीच आहे. जे चुकीचे घडते ते बरोबर करण्यासाठी काम करायचे आहे. जे अन्यायकारक घडत आहे त्यासंदर्भात प्रश्न उपस्थित करायचे आहे. कार्यरत असताना, आपण हे करत असतो कारण चुकीचे होऊ नये ह्याची दक्षता घ्यावी लागते. चुकीचे धोरण असेल तर आपण सुचवतो, लिहतो, प्रस्ताव पाठवितो. ही सकारात्मक कार्यवाही चांगल्यासाठी असते. इथे टीका करण्याचा किंवा विरुद्ध बोलण्याचा मुद्दाच येत नाही. सरकारचे काम समाजातील गरिबांना, वंचितांना न्याय देण्यासाठी आहे. आपलेही ध्येय तेच आहे. सरकारला पूरक असे । काम आहे. लोककल्याणचे

गुलामास गुलामीची जाणीव करून दिल्यास तो बंड करून उठेल.
– बाबासाहेब डॉ.आंबेडकर

आहे. त्यामुळे कोणत्याही वर्तणून नियमांचा भंग होत नाही. तसेही, बोलण्याचा, विचार मांडण्याचा, अभिव्यक्त होण्याचा संविधानिक मूलभूत अधिकार आहेच. एवढंच की मांडण्याची पद्धत चांगली व लोकशाही मार्गाची असावी लागते आणि असतेच. समाजाच्या प्रश्नासाठी संघटित पणे बोलायचे असते.

पदोन्नती मध्ये आरक्षण या विषयावर जसे कर्मचारी संघटना एकत्र आल्या, संघटितपणे बोलले जाते, लिहिले जाते, आंदोलन केले जाते, तसेच इतरही विषयावर कृती करण्याची गरज आहे आणि यात निवृत्त व सेवेत असलेल्या उच्चपदस्थ सनदी अधिकाऱ्यांचा सहभाग महत्वाचा ठरतो. वर्तणूक नियमाच्या नावाखाली, संविधानाच्या आरक्षणाचा फायदा घेतलेल सनदी अधिकारी यांनी अन्यायकारकर काहीही घडले तरी बोलयाचेच नाही का ? चुपच राहायचे का ? असं कसं होईल ? अशावेळी नाही बोलणार तर कधी बोलणार ? बाबासाहेबांना अपेक्षित शासनकर्ते कधी होणार ? वर्षानुवर्षे जे प्रस्थापित आहेत, ते मात्र आजही आपल्या समाजाच्या हितासाठी काम करतात. या सर्व बाबींवर मंथन–चिंतनाची गरज आहे.

शासन–प्रशासनात कार्यरत समाजाचे प्रतिनिधित्वा करणाच्या अधिकारी कर्मचारी यांनी निष्क्रिय भूमिका घेतली किंवा गुलामी मानसिकता जोपासून, मला काय त्याचे अशी भूमिका घेऊ लागले, वागू लागले तर कसं होईल ? खासदार आमदार यांना जसा दोष दिला जातो तसा दोष यांच्यावर सुद्धा येतो कारण हे ही आरक्षणाचे लाभार्थी आहेत आणि अधिकारात आहेत. मंत्रालयात, या उच्च पदस्थ सनदी अधिकाऱ्यांनी शोषित वंचितांच्या समस्या चे निराकरण करण्यासाठी एक welfare असोसिएशन किंवा Civil Sevants...for Social Cause.....असे किंवा अन्य नावाने संघटन कार्यान्वित करावे, सरकारला प्रश्न सांगावेत, सल्ला द्यावा, सोडवणून होईल अशी व्यवस्था करावी. एवढे तर नक्की जमेल.

अनेक प्रश्न व समस्या आहेत. पदोन्नती मध्ये आरक्षण, तसेच आरक्षणाची रिक्त पदे भरण्याची अनुशेष मोहीम असो. बजेट मध्ये निधी देणे असो. किंवा खर्च करणे असो, विविध कल्याणकारी योजनांच्या अमलबजावणी मधील अडचणी व समस्या असो, अट्रोसिटी ॲक्टची कठोर अमलबजावणी करण्याऐवजी कायदा प्रभावहीन करण्याची कार्यवाही करणे असो की अजून काही ही असो, शोषण–भ्रष्टाचार रोखणे असो, शिष्यवृत्ती, फि माफी, हॉस्टेल चे प्रश्न असोत, आरक्षणाच्या लाभार्थी अधिकाऱ्यांनी शोषण, पिळवणूक, जातीयवाद, भाईभतीजा वाद, भ्रष्टाचार, अन्याय–अत्यचार विरुद्ध आवाजी भूमिका घेतली पाहिजे. हे लक्षात ठेवले पाहिजे की अधिकाऱ्यांना मिळालेल्या आरक्षणाचा लाभ हे व्यक्तिगत फायद्यासाठी नाही तर सामाजिक हितासाठी आहे. कारण हे सामाजिक प्रतिनिधित्व आहे. त्यामुळे सामाजाचे प्रश्न मांडणे व सोडवून घेण्यासाठी प्रयत्न करणे ही सर्वच आरक्षण लाभार्त्यांची जबाबदारी आहे. अलीकडे, सनदी अधिकारी, अपवाद वगळता, समाजाच्या समस्यांकडे दुर्लक्ष करीत आहेत. या अधिकाऱ्यांकडे हातात सत्ता व अधिकार असताना, दुरुपयोग होत असेल, अन्याय होत असेल तर ? संविधानाशी बेईमानी ठरेल. फक्त चांगलं बोलून चालणार नाही तर चांगले, बेस्ट करुन दाखविले पाहिजे, हीच संविधान लाभार्त्यांची खरी ओळख ठरते.

सेवानिवृत्त उच्च पदस्थ, सचिव, प्रधान सचिव, अति मुख्यसचिव, मुख्यसचिव पदांवर कार्य केलेल सेवानिवृत्तीनंतर सुद्धा, काही सोडले तर अन्याय अत्याचाराविरुद्ध बोलताना दिसत नाहीत. त्यांच्या दीर्घ प्रशासकीय अनुभवाचा समाजाला फायदा काय जेव्हां की अनेक समस्या आहेत व कार्यरत यंत्रणा फार संवेदनशील होऊन लक्ष देत नाही. सेवेत असताना, नाही जमले, आतातर हिम्मत केली पाहिजे. आपल्या अनुभवाचा फायदा मिळवून दिला पाहिजे. मार्गदर्शन तर करताच येते. सेवानिवृत्त उच्च पदस्थ कोण कोण आहेत ? किती आहेत ? कुठे आहेत ? काय करतात ? समाजाने माहीत करून घेतले पाहिजे. सेवेत कार्यरत व सेवानिवृत्त सनदी अधिकाऱ्यांची डिरेक्टरी केली तर संपर्कासाठी चांगले होईल. सेवेत असणारे उच्च पदस्थ IAS यांनी पुढाकार घेतला तर नक्की होवू शकते.

स्वांतंत्र्यच्या ७५ वर्षात ज्यांना काहीच मिळाले नाही अशा शोषित, वंचित, उपेक्षित, दुर्बल समाज घटकांच्या भल्यासाठी संघर्ष करीत राहणे हे संविधानिक कर्तव्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा हा संदेश आहे, हीच शिकवण आहे. संविधानाचा निर्धार आहे. ध्येय उद्धिष्ट आहे. या दिशेने काम करण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. शील, चारित्र्य, स्वाभिमान अंगी असले की काही नक्कीच करता येते. जे करायचे ते साफसुथरे व स्वच्छ करायचे, न्यायाचे करायचे आहे. असे करणारा आपोआप ऊठून दिसेल. चमक दिसेल असे काम करायचे. चमकोगीरीच्या मागे न लागता आपली ताकद निस्वार्थ सेवेसाठी खर्ची घालायची. होऊ शकते. माझा स्वत:चा २९ वर्षाचा प्रशासकीय अनुभव आहे. थोडा त्रास सहन तर केलाच पाहिजे. जसे मतदार संघातील मतदार त्यांचे लोकप्रतिनिधींकडून मदतीची, सहकार्याची, मार्गदर्शनाची अपेक्षा करतात, तशीच अपेक्षा, समाजाच्या अधिकाऱ्यांकडून समाजातील लोक करीत असतात. त्यास उत्तरदायी होणेसाठी सनदी अधिकाऱ्यांनी पुढे यावे, भूमीका घ्यावी. हीच वेळ आहे, बाबासाहेबांच्या नावास खरे उतरण्याची. बाबासाहेबांच्या विचारानुसार काम म्हणजे राष्ट्र निर्माणाचे कार्य, समतेचे व न्यायाचे कार्य. सगळ्यांनीच करायची गरज आहे. अंतर्मुख होऊन विचार करून तर बघा. अडथळे कोलमडून पडतील. इच्छाशक्ती दाखविली की फरक पडेल असे काम होऊ शकते. जे करीत आहेत त्यांचे अभिनंदन आहे. अजून जोमाने करा म्हणजे जे करीत नाहीत त्यांना करावेसे वाटेल. समाजात प्रभाव पडेल, न्याय होईल, उठून दिसेल, अशा कामाची अपेक्षा

जब तक जातियों का पदक्रम बना रहेगा, तब तक इस पदक्रम की हर सीढ़ी पर खड़ी जाति, अपने स्र; नीची सीढ़ी की जाति का दमन करने का प्रयास करेगी ।

– पेरियार रामास्वामी

सर्व सामान्य लोकांना आहे. हेच सनदी अधिकाऱ्यांचे कर्तव्य व जबाबदारी आहे, दायित्व आहे. जे केले किंवा करीत आहेत ते थोडंस आहे. खूप करण्याची गरज आहे. शेवटच्या श्वासापर्यंत करत राहण्याची गरज आहे. जसे बाबासाहेबांनी केले. संविधान व कायदा अमलबजावणी करून त्यांचे खरे अनुयायी आहोत हे सिद्ध करण्याचा हा एक मार्ग उपलब्ध आहे.

मला वाटते, राज्यातील सर्व सनदी अधिकारी यांचे वेळोवेळी संमेलन आयोजित व्हावे. समाजिक व आर्थिक न्याय परिषदा व्हाव्यात. सामाजिक पातळीवर मोकळ्या चर्चेची ही गरज आहे. पदाचा इगो विसरुन एकत्र आले तर समन्वयातून संघटन शक्ती उभी राहू शकते. सामाजिक न्यायासाठी असे करणे. आजच्या परिस्थितीत, आवश्यक झाले आहे. कारण संविधानिक नितीमुल्ये नाकारण्याची प्रक्रिया मजबूत होताना दिसे. तेव्हा, सुरुवातीला, मुंबई–पुणे–नाशिक–कोंकण आणि मंत्रालयातील IAS अधिकारी यांनी एकत्र येऊन पुढाकार घेतला तर राज्यभर चांगले परिणाम दिसू लागतील. मंत्रालय सर्व सत्तेचं केंद्र आहे, चांगलं वाईट सगळं घडते येथे. वाईट व अन्याय थांबविण्यासाठी येथून सुरुवात करण्याची गरज आहे. आम्ही आहोत सोबतीला.

संविधानाचे लाभार्थी सगळेच आहेत. संविधानाच्या बाहेर कोणाला काही मिळत नाही. सत्ता, पद, पोझीशन, संपत्ती, मानसन्मान व प्रतिष्ठा संविधानामुळे आहे. तेव्हा संविधानिक दायित्व निभावणे हे समाजाच्या भल्यासाठी, देशासाठी आवश्यक आहे. संविधानिक नीतिमूल्ये चे आचरण केले तरच देशदेवा घडून येईल, अन्यथा नाही. देशाचे नागरिक म्हणून संविधानाचा सन्मान करायला पाहिजे. सन्मान करायचा म्हणजे संविधानिक नीतिमूल्ये नुसार काम करायचे. हे समजून घेणेसाठी, समजावून देणेसाठी संविधानाचा जागर करणे सुद्धा आवश्यक आहे. माझा स्वत:चा अनुभव, मी नागपूर जिल्हा परिषदेचा सीईओ असताना, माझे अधिकारात संविधान प्रास्ताविका दररोज शाळेतून वाचण्याचा उपक्रम नागपूर जिल्ह्यातील सर्व शाळांमधून २००५ मध्ये सुरु केला. याचवर्षी २००५ मध्ये २६ नोव्हेंबर ला संविधान दिवस साजरा केला. संविधान ओळख असे या उपक्रमाचे नाव देशात ह पहिल्यांदा घडले. शासन स्तरावर असे उपक्रम २००५ पूर्वी कधीही झाले नाही. सेवेत असताना आम्ही पाठपुरावा केला तेव्हा राज्यात सर्व शाळांमधून दररोज प्रास्ताविका वाचन सुरु झाले. एवढेच नव्हे तर शालेय पुस्तकाच्या पहिल्या पानावर प्रास्ताविका छापण्यात आली. शालेय शिक्षण मंत्री वसंत पुरके सर यांनी हा निर्णय घेतला. पुढे २००८ मध्ये राज्य शासनाने निर्णय घेतला की २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस म्हणून साजरा केला जाईल. देशभर संविधान दिवस साजरा करण्याचा निर्णय प्रधानमंत्री यांनी २०१५ मध्ये घेतला. तेव्हापासून दरवर्षी शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ, कार्यालयात संविधान दिवस साजरा दिवस साजरा होऊ लागला. प्रास्ताविका सर्वत्र दिसू लागल्या. पुस्तकातील प्रास्ताविका दिवाणखान्यात आली. हा बदल झाला. बदल घडवून आणता येतो. आम्ही घडवून आणला म्हणून सांगतो. सनदी अधिकारी यांनी असे बदल घडवून आणले पाहिजे. संविधानाने ही ताकद दिली आहे. ती वापरण्याची हिम्मत दाखवली की घडते.

संविधान फौंडेशन चे वतीने आम्ही संविधान जागृतीचे अनेक नाविन्यपूर्ण कार्यक्रम राबवित असतो. आता, संविधानाचा ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. २०२४ ला तेव्हा, संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्याची तयारी सनदी अधिकारी यांनी करावी. अधिकारी कर्मचारी यांच्या संघटनेने हे काम करावे आणि आपली संविधान निष्ठता सिद्ध करून दाखवावी, ही संधी आहे. सनदी अधिकारी संविधान व कायद्यानुसार काम करीत नसतील तर त्याचे वाईट परिणाम भोगावे लागणार आहेत. त्यात, सगळ्यांचेच नुकसान आहे. देशसेवेसाठी सनदी अधिकारी झालेत तेव्हा प्रामाणिकपणे देशसेवा करावी.

इ झेड खोब्रागडे
भाप्रसे नि
संविधान फौंडेशन, नागपूर
दि. १४ ऑक्टोबर २०२३
मो. 9923756900

समस्त धम्म बांधव व भगिनींना
धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या
हार्दीक मंगल सदिच्छा

SHREE GANESH TRADING CORP.

9th, Mahanagar Palika Complex,
Opp. Tehsil Office,
1st Floor, Akola-444 001
Email : shreeganeshtrading06@yahoo.com

ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून !
श्रमिकांच्या तळहातावर तरली आहे !!
– अण्णाभाऊ साठे

बाबासाहेबांनी दलितांना नव्हे तर आम्हाला माणसात आणलं...

गावगाड्याबद्दल वाटणारं अप्रूप मला दिवसेंदिवस कमी होत गेलं. गावगाडा गोंडस दिवस असला तरी तो असंख्य लोकांच्या रक्तावर पोसलेला आहे हे लक्षात येत गेलं. शोषणाच्या संस्कृतीचे शेवटचे अवशेष गावगाड्यानेच जपले, शहरं त्या मानाने लय दिलदार असतात. गावाबद्दल उगं रोमँटिक लिहणारे कवी आणि लेखक लोकं तद्दन भामटे असतात. कारण गावगाडा मांडताना ते आम्हा पाटलांच्या घरांमध्ये देवळीत ठेवलेला फुटका बाळीचा कप, आणि सालगडी माणसांची वेगळी ताटं आणि ग्लास कधीच मांडत नाहीत. आमच्या गढ्या आणि वाड्यांच्या मोठमोठोल्या मातीच्या भिंती उभारायला पाय वाकडे झाले. आमच्या माड्यांचे अवजड नक्षीदार खांब बनवण्यासाठी लागणारे लाकडं डोंगरातून खांद्यावर वाहून आणल्याने कित्येक खांद्यांना मरणांतिक कळ लागली असेल. आम्ही त्याच्या बदल्यात माणशी शेरभर ज्वारी दिली आणि मोकळे झालो. आजपर्यंत शाबूत असलेल्या आमच्या डौलदार माड्या आणि तिच्यावरुन दिसणारे कुडाचे, छपराचे महारवाडे पाहत आलो. आता आता महारवाड्यांचे बौद्धवाडे झाले. कुडाची घरं जाऊन पक्की घरं आली वेगळा असलेल्या बौद्धवाडा गावात मिसळून गेलेला दिसतो, ते पाहिलं की मनातला गिल्ट काही अंशी कमी होतो आणि म्हणून बाबसाहेबांच्या पायाला घट्ट मिठी मारावी वाटते.

मोठमोठे झाडं आणि दगड उकरुन याच महारवाड्यातल्या माणसांनी आमचे शेकडो एकरांचे मळे तळहातासारखे सपाट आणि सुपीक तयार करून दिले. त्याबदल्यात आम्ही त्यांना डाळींचा चुरा, अन कोंडा खायला दिला. हे कुणीच मांडलं नाही. पन्नासेक जनावरांच्या, म्हशींच्या शेणाच्या पाट्या वाहून त्यांच्या टाळूचे केस गेले. वासरांनी पायावर पाय देऊन अनेकदा रक्ताचे बुडबुडे आले, नखं उचकटली. त्याबदल्यात तपीलं भरून ताक देऊन आम्ही पाटीलकी दाखवत त्यांची बोळवण केली. ते सगळं डोळ्यासमोर उभं राहिलं की मरून मेल्यासारखं वाटतं. आज ते सगळं आठवून बाबासाहेबांच्या पायाला घट्ट मिठी मारावी वाटते.

बाबासाहेबांनी दलितांना माणसात आणलं हे फार चुकीचं वाक्य आहे. बाबासाहेबांनी दलितांना नाही, त्यांच्यावर अन्याय करणाऱ्या सवर्णांना माणसात आणलं. दलित माणसंच होते.आम्ही माणसासारखं वागत नव्हतो. त्यामुळे बाबासाहेबांचं ऋण आमच्या कातडीचा जोडा शिवूनही फिटणार नाही. कारण दलितांना आमच्यापासून वेगळं केलं नसतं तर आम्ही अजूनही त्यांचं रक्त शोषतच राहिलो असतो. म्हणून वाटतं सगळा भम्पक माज बाजूला ठेऊन बाबासाहेबांना घट्ट मिठी मारावी.

लै जुना काळ नाही, गावातल्या शाळेत बौद्धवाड्यातल्या पोरांची रांग वेगळी बसत होती.म्हणजे तसं कम्पलशन नव्हतं पण सामाजिक कंपूबाजपणा आणि हजारो वर्षाची डीएनएच्या जीनमध्ये रुजलेली/ठासून भरलेली शिकवण नकळत आपली विकृती दाखवायची. चौथीच्या मराठीच्या पुस्तकातल्या बाबासाहेबांच्या चित्राला पेनाने चित्र विचित्र मिशा काढून विद्रुप करायचो. आज ते हटकून आठवतं. अपराधी वाटतं. आणि त्याचं प्रायश्चित म्हणून बाबासाहेबांच्या पायाला घट्ट मिठी मारावी वाटते.

जवळच्या निमशहरात शिकायला होते. एक कार येऊन गल्लीत उभी राहिली. त्यातले माणसं उतरुन कुणाच्या तरी घरात जातात. कारच्या मागच्या काचेवर ''भीमा तुझ्या जन्मामुळे'' लिहलेलं. आमच्यातला एक थोडा प्रौढ मुलगा गेला आणि खाली त्या धूळ बसलेल्या काचेवर लिहून आला ''आम्ही माजलो''....आज ते सगळं आठवलं की वाटतं बाबासाहेबांनी आपल्यापर्यंत पोहोचायला किती उशीर केला. नंतर कळतं आपणच त्यांच्याजवळ जायला उशीर केला. शेवटी अपराधी फील झाल्यावर पुन्हा बाबासाहेबांच्या पायाला घट्ट मिठी मारावी वाटते.

वर्णव्यवस्थेचं खापर ब्राम्हणांवर फोडून मोकळे होणारे आम्ही खरे लबाड होतो. व्यवस्था ब्राम्हणांनी तयार केली असली तरी ती आम्ही उपभोगली, राबवली. कधी कोणता ब्राह्मण गावात अस्पृश्यता किंवा जातिव्यवस्था राबवण्याचं ट्रेनिंग द्यायला आल्याचं आठवत नाही.पण आज त्यांच्यावर सगळे आरोप ढकलून आम्ही सेफ झोनमध्ये राहण्याचा प्रयत्न करतो. सगळं सगळं साफ समोर दिसतं. पूणपणे गंडलोय आम्ही. दिशा दाखवणारे, आम्हाला माणसात आणणारे बाबासाहेब समजून घ्यायला आम्ही उशीर केला. आता समजून घेतोय. बाबासाहेबांचं बोट धरुन एक एक पाऊल टाकतोय. माणसात येण्याची प्रक्रिया किचकट असते, हळूहळू प्रयत्न सुरु आहे. भारी फील असतो हा....म्हणून बाबासाहेबांना घट्ट मिठी मारावी वाटते...

..कारण आम्ही खातो त्या भाकरीवरबी बाबासाहेबांची सही आहे रं.....!!

सोमनाथ कन्नर
मो. 9158145109

बेटी के विवाह से पूर्व उसे शिक्षित बनाओ ताकि वह अच्छे बुरे में फर्क कर सके ।
– सावित्री बाई फुले

भारताची किड : गप्प बसलेली पगारदार जमात

वाझहॅट म्हणतात, एक साधारण चोर आपले पैसे, आपली बॅग, आपले बॅग, आपले दागिने चोरतो पण एक राजकारणी चोर आपला भविष्य, आपला रोजगार, आपला धंदा, आपले आरोग्य, आपले शिक्षण व आपले अधिकार चोरतो. यामधील महत्वाची गोष्ट म्हणजे साधारण चोर कुणाला लुटायचं हे निवडतो ? पण राजकारणी चोरास, आपण स्वत:हून स्वत:ला लुटण्यास निवडून देतो. सध्या देशात एवढीच लोकशाही उरली असून अशा लोकशाहीचा उदोउदो करण्यासाठीच सरकार, राजकारणी व पत्रकार नेटाने काम करतांना आपल्याला दिसत आहेत.

पण त्याचवेळी भारतातील पगारदार आपल्या पगाराच्या शेपटीने आपली अब्रू झाकू पाहत आहे. मला काय फरक पडतो? माझं काय नुकसान आहे? त्याचं तो पाहत बसेल, तो चूप आहे ती मी कशाला बोलू? आपलं घर भलं नी आपण, पगार वाढतोय ना, डीए वाढतोय ना, वेतन आयोग मिळतो ना, घर आहे, गाडी आहे, मुलं चांगली शिकत आहेत आणखी काय पाहिजे, पेन्शन आहे, बोललो तर प्रमोशन होणार नाही, वरचं पद मिळणार नाही, बँक बॅलन्स आहे चिंता नाही.

चिंता नाही, या शब्दात भिषण भिती दडलेली आहे. वाघ सुद्धा तेव्हा घाबरतो जेव्हा त्याची शावके आवाज देऊनही दडलेल्या जागेतून बाहेर निघत नाही कारण निसर्गाचा नियम त्याला माहित आहे, तो इतरांच्या पिलांना खातो त्यामुळे त्याच्या शावकांना मारणाराही या निसर्गात आहे हे तो जाणतो.

एक दिवस जर कामवाली कामाला आली नाही तर आपण तिला सतरा प्रश्न विचारणार, फुकट काम करतेस का असंही ठणकावणार, तिची ऐपत काढणार पण पावसाळ्यात नालीतील पाणी घरात शिरल्यावर साध्या नगरसेवकाला जाब विचारण्याची हिंमत पगारदारात नसते, कमी शिकलेल्या, बुद्धीहिन, चरीत्रहिन, व्यवसनी, राजकारण्यांना पगारदार घाबरतात. हे देशाचं दुर्दैव आहे.

वस्तु व सेवा उत्पादक उद्योगपती सदैव नफ्यात कसा ? पण पिढ्यानपिढ्या शेती करणारा व अन्नधान्य उत्पादित करणारा शेतकरी सदैव तोट्यात कसा? भारतातील विशेष म्हणजे, शेती करणार तोट्यात आणि शेतीचे सामान विकणारा सदैव फायद्यात असतो. शिक्षण क्षेत्र चालविणारे शैक्षणिक उद्योगपती सदैव नफ्तयात पण शिक्षण घेणारे तरुण सदैव तोट्यात कसे? राजकारणात एकदा निवडून आले की त्यांच्या पिढ्यानपिढ्या सुखात पण मतदान करणारे व बदलाची अपेक्षा करणारे मतदार सदैव दु:खात कसे? राजमुद्रा बदला, शहरांची, रस्त्यांची नावे बदला पण कधी शेतकऱ्यांचा तोटा नफ्यात बदलवून दाखवा म्हणजे सरकारच्या बूडात किती दम आहे ते दिसेल. हे सर्व ठाऊक असतांनाही प्रश्न विचारणार कोण?

कर्ज काढून घेतलेल्या चारचाकी ने सुंदर रस्त्यांवरुन फिरताना मजा येते. अमुक अमुक रस्ते मंत्री खूप चांगलं करतोय अशी स्तुती ही येते. त्यांच्या कामाचं कौतुक करणे योग्य पण पेट्रोल भरतांना मनात शिवा येतात त्याचं काय? चांगले रोड बांधणे, दळणवळणाच्या सोयी निर्माण करण्याचा उद्देश हा वाहतूक खर्च कमी करणे व पर्यायाने वस्तुंच्या किमती कमी करणे हा असतो हे विचारणार कोण ? एका बाजूने रोड बांधले, दुसऱ्या बाजुने गरज व आवश्यकता नसतांना इंधनाचे दर वाढवले, तिसऱ्या बाजुने वाहनांच्या किमती खूप वाढवल्या, चौथ्या बाजुने आणखी रस्त्यावर टोल नाके बसवले, तुमच्याच चारचाकीचा रोडटॅक्स खूप वाढवला, वाहनांच्या विम्याचे दर वाढवले व भविष्यात खात्रीने मतदारांना लुटण्यासाडी हे रस्ते खाजगी मालकी कडे हस्तांतरित करणार हे सर्व माहीत असूनही त्या मंत्र्याला प्रश्न विचारणार कोण? आता याच चारचाकीच्या कर्जाचा एक हफ्ता नका भरू तर लगेच बँकेचे एजंट तुमच्या दारात उभे होतील पण हजारो करोड कर्ज घेऊन विदेशात पळून गेलेल्या शुरविरांचं कर्ज का माफ केले? असा प्रश्न विचारणार कोण ?

तुमच्या नोकऱ्या तुमच्या सेवानिवृत्तीच्या वयापर्यंत राहतील या विश्वासात जगू नका, पेन्शन मिळेल या भ्रामक कल्पनेत राहू नका कारण सरकारने कमाईचे सर्व स्त्रोत विकलेले आहेत आता केवळ कर जमा करणे, कर लादने व वस्तुंच्या किमती जमेल तितक्या वाढवणे एवढंच काम सरकारचं असणार आहे. तुमचा पगार केवळ जमा होणाऱ्या करावर अवलंबून राहणार असून कर वाढेल तरच पगार होईल अशी मानसिकता सरकारची असणार आहे. ज्यात तुमची नरडी सरकार दाबणार आहे. भारतात पगारदार ५० वर्षांचा झाल्यावर तो सक्षम आहे की नाही हे तपासण्यासाठी नियम आहेत पण राजकारणी ८० वर्षांचा होईल त्याचे दात पडतील तरी त्याची सक्षमता तपासण्याचा नियम नाही. राजकारण्यांची मुले राजकारणी बनतात पण पगारदारांची मुले पगारदार का बनत नाही ? ही नोकरीची तुमची शेवटची पिढी आहे हे सर्व माहीत असतांनाही प्रश्न विचारणार कोण ?

इकडे माणसाचा स्वभाव माणूस मरेपर्यंत बदलत नाही पण राजकारण्यांची विचारधारा मात्र एका झटक्यात बदलते. आच रात्री हे ज्या पक्षात झोपले त्याच पक्षात सकाळी उठतील का? हे खात्रीपूर्वक त्यांना स्वत:लाही सांगता येणार नाही. कालपर्यंत ज्या विचारधारेला व पक्षाला यांनी शिव्या दिल्या अचानक त्या पक्षात प्रवेश करून त्या पक्षाची थोरवी गातांना राजकारणी आपल्याला दिसतील. नैतिकता, नियम, निस्वार्थ सेवा, निष्पादन हे सर्व तुमच्या-आमच्यासाठी आहे. राजकारण्यांना हे लागू होत नाही पण हे सर्व त्यांना विचारणार कोण ?

' मी अशा धर्माला मानतो जो समता, बंधुता आणि स्वातंत्र्य देवू शकतो.....'
- बाबासाहेब डॉ.आंबेडकर

अन्नधान्य व जीवणाव्यसक वस्तूंवर जीएसटी लावून नुकतीच सरकारने आपली कर्तबगारी सिद्ध केलीय. सिलेंडरच्या भावात तर पैज लागली आहे, विम्याच्या हफ्त्यावरही कर आहे, हिरे घेण्यावर कमी कर आहे पण पेन्सिल घेण्यावर जास्त कर आहे.खतांच्या किमती वरच्या बाजुने व शेतमालाच्या किंमती खालच्या बाजुने का येतात, शाळेच्या फी का वाढत आहेत, सरकारी शाळा गायब का होत आहेत, दवाखान्याचे बिल जास्त का येत आहेत, पगारदार एका पगारात किती वेळ कर देत आहे, राजकारण्यांची संपत्ती पाच वर्षांतच १००० पटीने कशी वाढते, राजकारण्यांच्याच घरी आमदार खादसार कसे, आमची मुले लंगलंग (बेरोजगार) का फिरतात, तुमच्याच मुलांचे भविष्य उज्वल का, तू माझा नोकर आहे की मी तुझा, शहरांची नावे बदलून काय फायदा झाला, धर्माचा इतका पुळका का, मंदिर बनलाच पाहिजे हा अट्टाहास का, मी निवडून दिलेली सरकार का येत नाही अचानक आमदार पक्ष का बदलतात, विशिष्ट कपडे घालण्यावर बंधन का, तुम्हालाच पेन्शन का, रुपया का घसरत आहे, देशावरील कर्ज का वाढत आहे, सरकारी संपत्ती का विकत आहात, आमच्या कराच्या पैशाने बांधलेल्या रेल्वे रुळावर खाजगी रेल्वे कशी, तरुणांचा रोजगार कुठं गेला, सर्व पत्रकार सरकारची थोरवी गातांना का दिसतात, तुमची मुले लॅटरल एन्ट्री तून मोठ्या पदावर विराजमान कशी झाली, एकनिष्ठ पणाचे व जबाबदारी चे नियम तुमच्यासाठी का नाहीत, अशा कितीतरी प्रश्नंना विचारणार कोण? मजुर,, शेतकरी प्रश्न विचारणार नाही किंवा व्यवस्थेत बदल घडवून आणणार नाही. त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न इतका भिषण आहे की समस्या काय? हे त्यांना कळणारच नाही. त्यांच्यासाठी बदल हा शब्दच महत्त्वाचा नाही. त्यांना असेल त्या परिस्थितीत जगणे व आलेला दिवस ढकलणे एवढंच कळते पण मग सत्तेला प्रश्न विचारणार कोण ?

विरोधाने व्यवस्था मजबूत होते, समाजात समानता आणण्यासाठी विरोधाशिवाय दुसरा पर्याय नाही पण हा विरोध करणार कोण? विरोधक जवळपास निपचित आहेत. त्यामुळे बेलगाम घोड्यासारखी ही सरकार लोकांवर टाच मारून चाल करत आहे. या घोड्याला लगाम लावणारा एकच वर्ग उरलेला आहे व तो म्हणजे पगारदार. पण सध्या देशातील पगारदार पळपुटा, घाबरट व असंवेदनशील झाला असून मी इतरांपेक्षा बरा आहे व माझ्या घरी आग नाही यामध्येच तो समाधान मानत आहे पण या आगीचे चटके त्याला बसतील. भविष्यात पगार राहीलच हे तो आजही खात्रीने सांगू शकत नाही.

सरकारच्या चुकीच्या निर्णयाविरोधात बोलण्याची पगारदारांची हिंमत नसेल तर त्यांनी स्वत:ला कुटूंबभक्त व पगार प्रीय म्हणावे देशभक्त म्हणण्याची गरज नाही. स्वत:ला घाबरट म्हणावे, मला देशाची चिंता आहे असा आव आण्याची गरज नाही, स्वत:ला पळपुटा मी देशासाठी जीव देऊ शकतो असा खोटा आभास निर्माण करण्याची गरज नाही.

वरचे सगळे प्रश्न जर महत्वाचे नसतील व पगारदारांना त्यांचा पगारच महत्त्वाचा असेल तर मोठी पद तर सोडा, आज पगारदारांमध्ये हिंमत असेल तर आपल्या मुलांना साधं सरकारी मास्तर (संस्थापकाचे खिसे न भरता) बनवून दाखवावं त्यांना त्यांची कुवत लवकरच कळेल.

प्रा.आकाश
नेवजाबाई हितकारीणी महाविद्यालय, ब्रम्हपुरी, महाराष्ट्र.
ई–मेल : profakash123@gmail.com

योक्षम रजनी राजेश वासनिक
कमर्शियल पायलट लायसन्स
स्काय क्रीस्ट एविएशन लिमिटेड
ल्यांगली ब्रिटिश कोलंबीया, कॅनडा

तक्ष रजनी राजेश वासनिक
वय – १७ वर्ष
वर्ग – १० वी ९१%

''सर्वात आधी आणि सर्वात शेवटी आपण एक भारतीय आहोत.''
– बाबासाहेब डॉ.आंबेडकर

बाबासाहेबांची धम्माकडे वाटचाल

बाबासाहेबांनी ६७ वर्षापूर्वी आपल्या लाखो अनुयायी सोबत १४ ऑक्टोबर १९५६ ला मानवी जीवनात आमुलाग्र बदल घडविणारा असा आपणास बौद्ध धम्म दिला.

धम्मदीक्षा प्रवासाची सुरुवात १९२० च्या दरम्यान झाली १९२० मध्ये ब्रिटीश राजवटीने कायदा करून सर्वांना समानतेची वागणूक द्यावी असे कायद्याद्वारे स्थापित केले परंतू प्रत्यक्षात वंशपरंपरागत, रूढीवादी समाजा व्यवस्थेने ते साफ नाकारले, हिंदू धर्मात असतांना अपाल्या लेखनीतून, वाणीतून रूढीवादी परंपरेवर प्रचंड प्रहार केले. अनेक परिवंतनाचे मार्ग अवलंबिले परंतु त्याचा काहीसा उपयोग झालेला नाही.

२० मार्च १९२७ ला पाण्यासाठी महाडचा सत्याग्रह केला. २ मार्च १९३० ला काळाराम मंदिर (नाशिक) प्रवेशाचा सत्याग्रह केला. हा सत्याग्रह तब्बल पाच वर्षे चालला. शेवटी जो धर्म माणसाला दैनावस्था देतो तिथे राहायचे काय ? माणसासाठी धर्म कि धर्मासाठी माणूस ? असे प्रशन आपल्या समाजबांधवाना विचारु लागले. आपल्या दलीत बांधवांचे मन परिवर्तन करू लागले. या प्रक्रीयेत बाबासाहेबांना चौफेर सभा, परिषदा घेतल्या. अशातच १३ ऑक्टोबर १९३५ ला येवले (नाशिक) मुक्कामी आपली भूमिका जाहीर केली की, '' मी हिंदू धर्मात जन्मलो, जन्माला येणे माझ्या हातात नव्हते पण मी हिंदू म्हणून मारणार नाही.'' या घोषणेने हिंदू धर्म सोडल्यावर एक प्रकारचे शिक्कामोर्तब झाले.

बाबासाहेबांच्या घोषणेची उत्कंठा सर्व दलितांना लागलेली होती. बाबासाहेबांनी जागोजागी धर्मांतर का? यावर परिषदा घेतल्या ४ मे १९३६ (अमरावती) १७ में १९३६ (कल्याण) यात बाबासाहेबांनी सविस्तर पणे धर्मंतराची भूमिका स्पष्ट केली. धर्मातराचे पडसाद उमटताच मुस्लीम, शीख, ख्रिश्चन धर्मगुरुनी बाबासाहेबांना भेटून आपला धर्म स्विकरण्याविषयी विनंती केली. बाबासाहेबांनी मात्र सर्व धर्माचा सखोल अभ्यास केला. व बाबासाहेबांचा शोध बुद्धाजवळ थांबला. २० मे १९५६ रोजी मुंबई येथे भगवान बुद्धाच्या २५०० जयंती दिन कार्यक्रमा निमित्य आयोजनात बाबासाहेबानी बौद्ध धम्म स्वीकरण्याचे स्पष्ट केले.

बौद्ध धम्म स्वीकारण्याची तयारी सुरु झाली १४ ऑक्टोबर १९५६ हि तारीख ठरली. नागपूरची निवड करण्यात आली. बाबासाहेब ०३ दिवस नागपूर मुक्कामी होते. ठरल्याप्रमाणे १४ ऑक्टोबर १९५६ ला विजयादशमी दिनी धम्मदीक्षेचा सोहळा पार पडला. बाबासाहेबांनी स्वत: भंते चंद्रमणी यांच्या हस्ते बौद्ध धम्माची दीक्षा घेतली व त्यानंतर आपल्या ५ लाख अनुयायांना धम्माची दिक्षा दिली. धम्माची पकड मजबूत व्हावी म्हणून आपल्या अनुयाया कडून २२ प्रतिज्ञा वदवून घेतल्या. १४ ऑक्टोबर ला बाबासाहेबांनी बौद्ध धम्म का स्विकारला ?व नागपूरचीच निवड का केली ? याची स्पष्टोक्ती आपल्या भाषणात केली. १६ ऑक्टोबरला चंद्रपूर येथे धम्मदीक्षा सोहळा संपन्न झाला.

पुढील धम्मदीक्षा सोहळा १६ डिसेंबर १९५६ ला मुंबई येथे ठरलेला होता परंतु ६ डिसेंबर १९५६ ला आभाळ फाटावे तसे बाबासाहेबांचे महापरीनिर्वाण झाले. हा धम्मदीक्षा सोहळा पुढे जानेवारी १९५७ ला मुंबई येथे ठरल्या प्रमाणे घेण्यात आला. असा हा धर्मांतरचा प्रवास सतत सुरु आहे. म्हणूनच म्हणतात बाबासाहेबांमुळे आम्हास बुद्ध गवसला.....

सुधाकर वा. शेंडे
एम.ए.(आंबेडकर विचारधारा)
प्राचार्य (सर्वसाधारण)
औद्योगिक प्रशिक्षण संस्था पालांदूर
ता. देवरी, जि.गोंदिया



स्मृतिशेष
रामभाऊ तेलतुंबडे
यांचे स्मृतीस
विनम्र अभिवादन

अभिवादक–
आयु. संजय रामभाऊ तेलतुंबडे
प्राचार्य औ.प्र.संस्था वणी

समस्त धम्म बांधव व भगिनींना
धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या
हार्दीक मंगल सदिच्छा !

YASH
MARKETING
105, VIJAY HOUSING SOCIETY,
GOURAKSHAN ROAD, AKOLA

जो धर्म तुम्हें नीच ठहराता हैं, तुम उस धर्म को लात मार दो !
– पेरियार रामास्वामी

बुद्ध आणि चार आर्य सत्य...

बुद्धाने जगातील दु:खावर चार प्रकारचे आर्य सत्य शोधून काढलेले आहे जेव्हा बुद्धाला असे तीव्रपणे जाणवले की या जगात दु:ख आहे आणि मानव दु:खामध्ये लोटल्या गेलेला आहे. त्याचे उत्तर शोधण्यासाठी अथक प्रयत्न केले व ज्ञानप्राप्तीनंतर बुद्धाने चार आर्य सत्य सागितले एक जगात दु:ख आहे दोन दु:खाला कारण आहे तीन ते नष्ट केले जाऊ शकते आणि चवथे ते नष्ट करण्यासाठी उपाय सुद्धा आहे हे सगळं पाहत असताना असं वाटत कि बुद्धानी सांगितलेल्या आणि शोधून काढलेल्या चार आर्य सत्यांच्या आजच्या आधुनिक जगामध्ये काही अर्थ आहे काय? तर असे जाणवते. बुद्धाच्या काळापेक्षा आजच्या काळामध्ये ह्याची अत्यंत जास्त गरज आहे ते समजून घेणे त्याच्यावर विचार करणे व अमल करणे आणि दु:ख मुक्त जीवन जगणे हे अत्यंत महत्वाचे झाले आहे. जेव्हा बुद्धाने चार आर्य सत्य जगाला सांगितले त्यावेळेस व त्याहीपूर्वी दु:ख नव्हते काय ? मात्र कुणी सांगितलेच नाही असे सांगणे म्हणजे औचीत्या चा भंग होणार नाही, बुद्ध म्हणतो की दु:ख होण्याची एक श्रृंखला आहे ज्यावेळेस पाश्चिमात्य देशांची संस्कृती जी संस्कृती आज आपण बघतोय भौतिकवादाची संस्कृती आहे ग्राहक केंद्रित आहे ह्यामुळे भौतिक सुखाकडे आजचा मानव वळलेला आहे. भौतिक सुख म्हणजे शेवटी काय आहे तर ती एक प्रकारची तृष्णाच आहे आणि ही तृष्णा दिवसेदिवस वाढत चाललेली आहे. आपण पाहिले तर जगामध्ये फक्त अतिश्रीमंत त्याखालोखाल श्रीमंत त्याखोलोखाल मध्यम वर्ग आणि त्याच्यानंतर गरीब हे सगळे तृष्णेने ग्रासले आहेत ज्याच्याकडे आहे तो पुन्हा तृष्णेमुळे अधिकाधिक भौतिक वादाकडे झेपावतो आहे ज्याच्याकडे थोडं कमी आहे ते पूर्ण करण्यासाठी तो प्रयत्न करत आहे आणि ज्याच्या कडे काहीच नाही तो वर्ग सुद्धा आपणाकडे काही असावं ह्या धारणेमध्ये गुरफटलेला आहे आणि हीच ती तृष्णा आहे जी भौतिकवादाची मानसिकता आहे आणि हीच नेमकेपणाने आजच्या जगातल्या मानवाला दु:खाकडे घेऊन जात आहे. या संदर्भात बुद्धाने सांगितलेल्या चार आर्य सत्यांच महत्व ठळकपणे अधोरेखित होते. दु:ख आहे हे अमान्य करणारा पृथ्वीतलावर कोणताही मानवप्राणी आढळणार नाही तो मान्य करणारच ! सर्वप्रथम दु:ख आहे दु:खाच कारण आहे त्या दु:खाला नष्ट करता येतं का आणि नष्ट करण्यासाठी काही उपाय आहेत काय ? याच्याकडे सपशेल दुर्लक्ष झालेले आहे अनेक धर्म या पृथ्वीतलावर आहेत प्रत्येक धर्माच्या माणसाला त्याचा धर्म श्रेष्ठ वाटतो आणि मग या श्रेष्ठत्वाच्या कल्पनेने तो इतर कोणत्याही गोष्टीला इतर धर्मांना नाकारत जातो. एकीकडे असेही दाखले किंवा अश्याप्रकारची भलामण सुधा केली जाऊ शकते कि भौतीकवादाचा त्याग केला गेल्यास जो आनंदत्यातून मिळतो त्याला मुकावे लागेल. बुद्धाने निक्षून सांगितलेल्या दुख:मुक्तीच्या मार्गाकडे आपण जर बघितलं तर सामान्य माणसाच्या जीवनात दु:ख संपूर्णपणे नष्ट होऊन तो सुखाकडे मार्गक्रमण करू लागेल ; आता सुख म्हणजे तरी काय ? ह्याच्या सुद्धा वेगवेगळ्या धारणा व व्याख्या जनसमूहांमध्ये प्रचलित आहेत जसे वर उल्लेखित पाश्चिमात्य देशांचा भौतिकवाद किंवा ग्राहक केंद्रित संस्कृती. जर हे बंद करावे लागल्यास आणि मग बंद करून खरंच दु:ख नष्ट होईल का तर त्याचे उत्तर नकरार्थी आहे आणि म्हणून सुख म्हणजे काय हे सुद्धा आपण समजून घेणे आवश्यक आहे आता हे समजून घेत असताना भौतिक वादातून जे सुख मिळते ज्याला आपण आनंद म्हणतो तो किती काळ टिकतो यावर विचार करणे क्रमप्राप्त ठरते मग आता बुद्धाच्या नंतर भिक्खू संघाने आणि त्यांच्या विविध देशातल्या अनुयायांनी त्यांची शिकवण जोपासलेली आहे त्याचा प्रचार प्रसार करणे निरंतनपणे चालू आहे अबाधित आहे त्याचा फायदा मात्र आनंदाच्या अंधारात चाचपडत असलेल्या या माणसांपर्यंत एकतर पोहोचू शकत नाही किंवा पोहचले नाही आणि दु:ख नष्ट झाले नाही.

बुद्धाने ध्यानधारणा यावर भर दिला आहे किंबहुना आपल्याला असे म्हणता येईल की दु:ख मुक्तीचा मार्ग हा ध्यानधारणेमुळे सुकर होतो त्याच्या खोलात जाऊन आपल्याला असे म्हणता येईल किंवा आपल्याला असं दिसेल कि मानवी शरीर डोक्यापासून पायापर्यंत अनुरेणूं नि बनलेले आहेत त्यास बुद्धाने चार धातू (पृथ्वी, अग्नी, वायू व जल) असे म्हटलेले आहे या धातूपासून बनलेला हा मानवाचा देह ह्या देहामध्ये वसलेलं मन यांच्यामध्ये अतूट असे नाते आहे आणि जर आपण हे नातं समजून घेतल्यास दु:ख मुक्तीच्या मार्गाकडे मार्गक्रमण निश्चितपणे होऊ शकत. मानवाचा देह या देहामध्ये अनेक रसायने आहेत मानवाचे मन राग द्वेष लोभ मोह माया इत्यादी अशा अनेक अवगुणांनी भरलेले आहे हे अवगुणं पहिल्यांदा मनावर येतात आणि मनामध्ये आल्यानंतर त्याचा परिणाम देहावर होतो यालाच आपण सोप करुन जर पाहिलं तर समजा आपल्याला राग आला तर आपला आवाज वाढतो जास्तच राग आला तर कानशिलं गरम होतात अंग थरथर कापते आणि इतर काही ह्याहून वेगळ्या प्रतिक्रिया उमटतात आणि त्या आपल्याला दिसतात अनुभवता येतात त्याला हात लावू शकतो त्याला पाहू शकतो. आपल्या शरीरात अनेक प्रकारच्या ग्रंथी आहेत त्या ग्रंथीमध्ये अनेक प्रकारचे रसायने आहेत. जेव्हा आपल्या मनामध्ये अवगुण निर्माण होतात किंवा तशी भावना मनामध्ये प्रथमता उमटते तेव्हा हे रसायनं एकमेकांमध्ये मिसळून शरीरावर प्रतिक्रिया म्हणून उमटतात साधं रोजच्या जीवनातील प्रसंग घेतल्यास लक्षात येईल की शुल्लक कारणाने लोक एकमेकांना मारतात. शुल्लक गोष्टीवरुन एकमेकांचा खून करतात शुल्लक कारणावरुन दुरावा निर्माण होतो हे सगळे कशामुळे तर वर सांगितल्याप्रमाणे शरीरावर तत्पूर्वी राग द्वेष लोभ मोह माया ह्या प्रकारचे अवगुण मनामधे

''विद्येविना मती गेली, मती विना नीती गेली, नीती विना गती गेली, गतिविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले''

\- ज्योतिबा फुले

उठून शरीरावर प्रतिक्रिया करतात आणि मग माणसाच्या हातून दुष्कृत्य घडून त्याच्या कुटुंबात व समाजात दु:ख निर्माण होते.

बुद्धाने सांगितलेल्या चार आर्यसत्य व त्यांचा अन्वयार्थ आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये कसा लावावा आणि तो लावत असताना त्यावर अमल कसा करावा असा प्रश्न निश्चितपणे आ वासन आहे उभा आहे असे दृष्टीपथास पडते.

यावर बुद्धाने ध्यान धारणा हा उपाय म्हणून सांगितलेला आहे यावर कदाचित अनेकांची वेगळी धारणा/मते असू शकतात पण बाबासाहेब डॉ. आंबेडकर सुद्धा आपल्या बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथामध्ये ध्यानधारणेचा उल्लेख वारंवार करतात त्यात ते वारंवार ध्यानधारणा करणाऱ्यास MEDICANT असे संबोधतात. हे समजून घ्यायचं असेल तर बुद्धाने सांगितलेल्या ध्यानधारणेच्या पद्धतीस समजून घेतले पाहिजे.

विपस्सना हि ती पद्धत होय.

जेव्हा एखाद मनुष्य विपस्सेनेच्या पहिल्या शिबिराला जातो किंवा जाते तेव्हा धम्म काय आहे बुद्धाची शिकवण काय आहे दु:ख आहे दु:ख कशा प्रकारचे आहे हे ध्यानात येऊ लागते काही लोकांना तर पहिल्याच शिबिरामध्ये दु:ख आहे दु:खाला कारण आहे दु:ख नष्ट करता येत आणि त्याला उपाय आहे मार्ग आहे हे समजून येते आणि हाच धम्म आहे असे त्याच्या ध्यानात येतं ध्यानधारणेच्या अनेक पद्धती आहेत बुद्धाच्या पद्धती कडे पाहिले विचार केला तर बुद्धाला मानणाऱ्या वेगवेगळ्या मनुष्य समूहाच्या वेगवेगळ्या पद्धती बुद्धाने अनुसरल्या होत्या अशा प्रकारचा प्रचार समाजामध्ये करीत असतात आणि त्या योग्य आहेत किंवा नाही याची चर्चा करणे ह्या ठिकाणी संयुक्तिक होणार नाही.

तर विपस्सना मध्ये जेव्हा प्रशिक्षणार्थी पहिल्यांदा आपल्या श्वासावर लक्ष केंद्रित करतो याचा जेव्हा हळूहळू सराव होतो आणि श्वासावर ध्यान केंद्रित करत असताना श्वास आत जातो आहे बाहेत निघतो आहे असे बघत असताना प्रशिक्षणार्थ्याचे मन भूतकाळ भविष्यकाळात भटकत असते. जेव्हा तो आपल्या डोक्यापासून पायापर्यंत आणि पायापासून डोक्यापर्यंत शरीरावर उमटणाऱ्या प्रत्येक प्रतिक्रियेस पाहू लागताच कुठेतरी खाज सुटते कुठेतरी जळण्याची प्रतिक्रिया उमटते कुणाच्या पायाला मुंग्या येतात अनेक गोष्टी आहेत ज्या शरीरावर प्रत्येक क्षणी उमटत असतात आणि मग या सगळ्या प्रतिक्रिया सरावाने अगदी तटस्थपणे तो/ती पाहते आणि पहात असताना त्याच्याकडे मग दुर्लक्ष करत जातो आणि नंतर एक वेळ अशी येते की अशा प्रकारच्या प्रतिक्रिया ज्या दु:ख निर्माण करतात ज्या प्रतिक्रिया पहिल्यांदा मनावर येतात आणि शरीरावर उमटतात या प्रतिक्रियांचे निर्जलन होऊन काहीवेळाने त्या आपोआप नष्ट होतात आणि अशाच वेळेस मनाचे आणि शरीराचे किती अतूट नात आहे हे समजायला लागते प्रशिक्षणाथर्क्ष जसाजसा यामध्ये पुढे जातो त्याची साधना पक्की होत जाते तसेतसे त्याच्या मनावर उमटणाऱ्या अनेक प्रकारच्या प्रतिक्रिया कमी होतात आणि कमी झाल्यामुळे त्याच्या जीवनामध्ये सुखाचा प्रवेश होऊ लागतो म्हणून बुद्धाने सांगितलेल्या ध्यानधारणेचा प्रचार–प्रसार होणे क्रमप्राप्त ठरते.

विपस्सनेची चर्चा करतांना असताना किंवा त्याकडे बुद्धाने सांगितलेल्या ध्यानधारणेचा मार्ग असे म्हणू पाहत असताना इतर ध्यानधारणेच्या मार्गांना कमी लेखण्याचा कुठल्याही प्रकारचा प्रयत्न नाही मात्र ध्यानधारणा करून आपल्या दु:खास समाप्त करुन सुखाला आपल्या जीवनामध्ये हळूहळू प्रवेश करू देणे हेच दु:ख मुक्तीचे मार्गक्रमण होय असे मानता येईल नव्हे तर हाच मार्ग अवलंबला तरच आपल्याला धम्म समजण्यासाठी व त्यायोगे दु:ख कमी करण्यासाठी निश्चितपणे हातभार लागणार आहे.

सुशील रामदास बुजाडे
चंद्रपूर

कु. रजत भारत मोटघरे

११/०९/१९९८, वय वर्षे : २४

१. बी.ई. इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकॉमिनेकशन (प्राविण्यासह) नागपूर विद्यापीठ (सन २०२०)

२. एम.एस.सी. कम्प्युटर गेमींग इंजिनिअरिंग (प्राविण्यासह) न्यु कासल विद्यापीठ, यु.के. (सन २०२२)

'माझा खजिना रिता झाला तरी मला त्याची पर्वा नाही ! पण माणसाला माणुसकीपासून वंचित करणारी रूढी मला मोडायची आहे.'
– राजर्षी शाहू महाराज

शासकीय उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण, संस्था, इंदोरा, नागपूर येथे प्राचार्य पदावर कार्यरत असलेले आयु. **केतन सोनपिपरे हे ''मेमरी गुरु''** म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी २००६ मध्ये डॉ. विश्वरुप रॉय चौधरी ज्यांची नोंद ''लिमका बुक ऑफ रेकॉर्ड'' व '' गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'' मध्ये आहे. त्यांच्या सोबत प्रशिक्षण घेतले आहेत.

२०२० व २०२१ मध्ये केतन सोनपिपरे यांनी " World Memory Sports Council of India" तर्फे आयोजित "National Memory Championship " मध्ये प्रतिनिधत्व केले आहे. २०२१ मध्ये ''वर्ल्ड माईन्ड मॅप व स्पीड रिडिंग चॅम्पीअनशिप'' मध्ये भारताचे प्रतिनिधित्व जागतिक स्तरावर फ्रान्स, जर्मनी, स्कॉटलॅन्ड तर्फे आयोजित स्पर्धेत केले आहे. विशेष बाब म्हणजे यावर्षी दिनांक २४,२५,२६ नोव्हेंबर २०२३ ला भारतात प्रथमच "The world cup of memory for the first time in India " WORLD MEMORY CHAMPIONSHIP" आयोजित आहे. त्यासाठी जी ग्लोबल कमिटी स्थापन केले आहे. त्या कमेटीचे केतन सोनपिपरे हे एक्सीक्युटीव मेंबर आहेत. त्यासाठी त्यांन मुंबई येथील हॉटेल ताज मध्ये त्यांचे Brain Infinite चे अमृत जाधव व आयोजित समितीने सत्कार केला आहे.

सोबतच ऑगस्ट २०२३ मध्ये ह्यांचा दिल्ली येथे हॉटेल रेडिसन ब्लू येथे ''अनोखा ब्रेन'' चे फाऊन्डर व सिईओ दिपक जैन व आलोक मित्तल व टिम ने त्यांना प्रमाणपत्र देऊन सत्कार केला व त्याच कार्यक्रमांत त्यांना " ANOKHA HALL OF FAME AWARD" हा श्री संदिप भंसाली (ज्यांनी भारतीय टेलिव्हीजन वर आहट, सिआयडी, मोहिनी, आजोबा वयात आले, वो रहनेवाली महलोकी, आयुष्यमान इत्यादी टेलिव्हीजन वर काम केले आहे) ते भारतातील " Digital Azadi Ka Rachiyata " चे फाऊन्डर चे सिईओ आहेत व त्यांच्या हस्ते त्यांना अवॉर्ड देण्यांत आला.

श्री. केतनकुमार सोनपिपरे
प्राचार्य,
शासकीय उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
इंदोरा, नागपूर

अभिजीत सुधाकर शेंडे

Algoma University, Brampton, Kanada
ह्या नामांकित University मध्ये
Project Management

हा कोर्स करण्याकरिता निवड झालेली आहे.
पालक आयु. सुधाकर शेंडे
व आयुष्यमती शांता सुधाकर शेंडे, नागपूर

कु. साक्षी शैलेश पाटील
मार्च २०२३
१० वी (CBSE)- ९८%

श्रीश शैलेश पाटील
ऑगस्ट २०२३, MBBS
N.K.P. Salwe Medical College
Nagpur
प्रथम वर्षाला प्रवेश

'' माणसाचा एकच धर्म असावा सत्याने वर्तावा, ज्योती म्हणे''
- ज्योतिबा फुले

सध्या बेरोजगारीचे आकडे वाढतच आहे. बेरोजगारीची समस्या जागतिक दर्जाची होत असतानाच औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथील सेवानिवृत्त प्राचार्य सुनील वानखडे यांनी हजारो विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून दिलेला आहे. सुनील वानखडे हे दि. ३१ ऑक्टोबर २०२२ ला प्राचार्य वर्ग १ मधून सेवानिवृत्त झालेले आहेत. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण या खात्यात असिस्टंट लेक्चरर म्हणून रुजु झालेले सुनील वानखडे नंतर गट निदेशक, कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार, प्राचार्य वर्ग २, मुख्याध्यापक, आणि प्राचार्य वर्ग १ या प्रमुख पदापर्यंत येऊन पोहोचले. या संस्थेत विविध पदावर काम करत असतानाच तरुणांच्या बेरोजगारांच्या समस्येचा त्यांनी अभ्यास केला. आणि व्यवसाय प्रशिक्षण पूर्ण झालेल्या प्रत्येक तरुणाला रोजगार मिळवून देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. अभ्यासक्रम पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकडून बायो डाटा लिहून घेणे. कंपनी कडून रिक्त जागांची माहिती घेणे. प्रशिक्षणार्थ्यांना कंपनीत पाठवणे, त्याचा पाठपुरावा करुन त्यांना शिकाऊ उमेदवारी व रोजगार मिळवून देणे असे रोजगार पूर्ततेसाठीचे सगळी काम वानखडे सरांनी मन लावून आणि प्रामाणिकपणे केले. पाच हजारांच्या वर विद्यार्थ्यांचे रोजगार मेळावे आयोजित करुन त्याच्या रोजगाराच्या प्रश्नांना वाचा फोडली. मुंबई, पुणे, ठाणे औरंगाबाद अश्या विविध ठिकाणी विद्यार्थ्यांची भरती करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारून अनेक विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन दिला.

हल्लीच्या बेरोजगारीच्या काळात रोजगारासाठी प्रयत्न करत अनेक तरुणांचे भविष्य उज्जवल करण्यासाठी प्राचार्य सुनील वानखडे यांचे मोलाचे योगदान आहे.

– सेवानिवृत्त प्राचार्य सुनील वानखडे

सुबोध सुनिल वानखडे

B.Tech (Mech. Engg.)
M.Tech. (Mech. Engg) Final Year
ITI, Bombay Pawai, Mumbai.

जागतिक शांतता शिखर परिषद, दक्षिण कोरिया येथे डॉ.बेनिराम कोचे यांचा शांतता पुरस्काराने गौरव–

जागतिक शांतता शिखर परिषद, दक्षिण कोरिया येथे डॉ.बेनिराम कोचे संचालक, जीवक योग उपचार आणि प्रशिक्षण संस्था तसेच निदेशक, शा. औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर यांना दिनांक १८ सप्टेंबर २०२३ ला HWPL च्या शांतता उपक्रमांना सहकार्य करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल शांतता पुरस्कार'' प्रदान करण्यात आला. प्राप्तकर्त्यांमध्ये जगभरातील १३ व्यक्तीं, एच.ई.प्रो.डॉ.एमिल कॉन्स्टँटिनस्कू, रोमानियाचे तिसरे राष्ट्राध्यक्ष; एच.ई.श्री ओमर केता, युनेस्को मुख्यालयात मालीचे माजी स्थायी प्रतिनिधी; आणि डॉ. सियारन बर्क, जर्मनमधील फ्रेडरिक शिलर विद्यापीठ जेना येथील आंतरराष्ट्रीय कायद्याचे प्राध्यापक इत्यादींचा समावेश होता.

HWPL च्या ९ व्या वर्धापन दिनानिमित्त दक्षिण कोरियाच्या इंचॉन येथे ''जागतिक शांतता शिखर परिषद'', दिनांक १८ ते २१ सप्टेंबर २०२३ पर्यंत आयोजित करण्यात आले होते. या परिषदेत युनायटेड स्टेट्स, फिलीपिन्स, युक्रेन, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, थायलेंड, रोमानिया आणि भारतासह १२१ देशांतील १,८०० हून अधिक प्रतिनिधी हजर होते.

वास्तविक आणि शाश्वत शांतता प्राप्त करण्यासाठी, HWPL शांतता आणि युद्ध समाप्तीच्या घोषणेवर आधारित आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य ठोस संस्थापक शांतता निर्माण करण्यासाठी वकिली करते जे संघर्ष प्रतिबंधापासून शांतता राखण्यापर्यंतच्या शांतता निरंतरतेच्या सर्वसमावेशक उपायांचा प्रस्ताव देते, याव्यतिरिक्त, HWPL आंतरधार्मिक संवाद सुलभ करणे, तरुण आणि महिल्यांच्या नेतृत्वाखालील शांतता उपक्रमांना चालना देणे, शांतता शिक्षण प्रदान करणे आणि माध्यमांच्या माध्यमातून शांततेच्या संस्कृतीचा प्रचार करणे यासारखे उपक्रम सुरु ठेवते.

प्रगती अहवाल सादरीकरण्यात HWPL चे व्यवस्थापकीय संचालक कांग ताए–हो यांनी DPCW च्या प्रगतीची ओळख करुन दिली, ज्यांना १७६ देशांतील तसेच मध्य अमेरिकन नागरिक समाजाकडून सुमारे ९००,००० मते (किंवा प्रस्ताव किंवा स्वाक्षरी) मिळालेली आहेत. संसद, आणि मिंडानाओचे प्रकरण, जे खाजगी–स्तरीय शांतता कराराचे उदाहरण आहे.

लोकशाहीचे दोन शत्रू म्हणजे 'हुकुमशाही' आणि माणसांमाणसांत भेद मानणारी 'संस्कृती'
– बाबासाहेब डॉ.आंबेडकर

एक सुर्य उगवला
त्या महुच्या मातीत....
अन्यायाच्या बेड्या
झुगारून दिल्या
नव प्रकाश...
देवुन नव दिशा
या पामरांना
झुकविले आकाश...
रात्र होती वै–याची
लचके तोडण्या
दबा धरुन बसली
होती गिधाडे...
केले कायद्याने
सुरक्षित...
दिला सर्वांना
समान हक्क
सर्व धर्मांना न्याय
निरपेक्ष...
नांदती येथे सर्व
गुण्या गोविंदा ने...
कठोर मेहनत घेवुन
दिले भारतास संविधान.
धम्मचक्र प्रवर्तन
करून दिला जणु या
लेकरांना पुनर्जन्म...

सिद्धार्थ मेहेरे
नागपुर.
मो. 9890225699

समस्त धम्म बांधव व भगिनींना
धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या
हार्दीक मंगल सदिच्छा !

FRICK
DESIGNS
PVT. LTD.NASHIK

UNAWANE & SON

समस्त धम्म बांधव व भगिनींना
धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या
हार्दीक मंगल सदिच्छा !

अनंत सोमकुवर

जिल्हा व्यवसाय शिक्षण व
प्रशिक्षण अधिकारी
नागपुर.

'' कोणत्याही समाजाची उन्नती त्या समाजाच्या प्रतीवर अवलंबून असते.''
- बाबासाहेब डॉ.आंबेडकर

तांत्रीक शिक्षण कर्मचारी पगारदार सहकारी पत संस्था मर्यादीत, नागपूर विभाग

व्यवस्थापक समिती

सन २०२२ - २०२७

श्री. जयंत टालाटुले
अध्यक्ष

श्री. विजय बांबल
उपाध्यक्ष

श्री. सिद्धार्थ मेहेरे
मानद सचिव

श्री. मुकेश मेश्राम
सहसचिव

श्री. दिपेन्द्रकुमार साहु
कोषाध्यक्ष

श्री. विजय नगरारे
हिशोब तपासणिस

श्री. सहदेव चव्हाण
संचालक

श्री. नारायण मानेकर
संचालक

श्री. अशोक जवंजाळ
संचालक

श्री. सुधीर गावंडे
संचालक

श्री. मुकेश मेहर
संचालक

श्री. राजेंद्र गायकवाड
संचालक

श्री. दिलीप मस्की
संचालक

सौ.छाया मेश्राम (भैसारे)
संचालिका

सौ.माधुरी बालपांडे
संचालिका

श्री. संजय मस्के
तज्ञ संचालक

श्री. सुधाकर शेंडे
तज्ञ संचालक

तांत्रीक शिक्षण कर्मचारी पगारदार सहकारी पत संस्था मर्यादीत, नागपूर विभाग

✻ वैशिष्ट्ये ✻

१. सर्वसाधारण कर्ज रु. ७,००,०००/- व्याज दर : १२%
२. आकस्मिक कर्ज रु. ५०,०००/- व्याज दर : १२%
३. मुदत ठेव - १ वर्ष
४. सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार
५. गुणवंत पाल्यांचा सत्कार (दहावी व बारावी)
६. वेळोवेळी सामाजिक कार्यात मदतीचा हातभार
७. सभासद मृत्युफंड - रु. २५,०००/-

भारताचे संविधान

उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;
दर्जाची व संधीची **समानता** ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

आमच्या संविधानसभेत
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.